दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १२९) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.१६ मे २०२६
पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## ओमान-युएईपर्यंत अंथरणार 'पाइपलाइन'
### होर्मुझ तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताचा मोठा निर्णय

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण संघर्षामुळे 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'मधील तणावही प्रचंड वाढला आहे. यामुळे संपूर्ण जगभरातच मोठे इंधन संकट निर्माण झाले आहे. परिणामी बाजारातही मोठी अस्थिरता दिसून येत आहे. या संपूर्ण पार्श्वभूमीवर आता भारताने आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी एक अत्यंत महत्वाचा आणि महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. आखाती देशांकडून होणारा नैसर्गिक वायू पुरवठा अखंडपणे सुरू रहावा, यासाठी आता भारत थेट खोल समुद्रात पाइपलाइन अंथरणार आहे. या योजनेवर वेगाने कामही सुरू झाले आहे. या योजनेमुळे भारताचे अस्थिर एलएनजी स्पॉट मार्केटवरील अवलंबित्वही कमी होईल.

'द इकोनॉमिक टाइम्स'च्या वृत्तानुसार, ओमान ते भारतापर्यंत प्रस्तावित या पाइपलाइनचा अंदाजित खर्च सुमारे ४०००० कोटी रुपये अथवा ४.७ ते ४.८ अब्ज डॉलर्स एवढा असणार आहे. तसेच हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी ५ ते ७ वर्षांचा कालावधी लागणे अपेक्षित आहे.

यासंदर्भात, पेट्रोलियम मंत्रालय 'गेल', 'इंजिनियर्स इंडिया' आणि 'इंडियन ऑइल' यांसारख्या सरकारी कंपन्यांना खाजगी कन्सोर्टियम 'एसएजीई'ने केलेल्या अभ्यासाच्या आधारे सविस्तर अहवाल तयार करण्यास सांगणार आहे. या अहवालामुळे ओमानसोबत गॅस पुरवठा आणि निधीबाबत औपचारिक सरकारी चर्चा करणे सोपे होईल.

ही पाइपलाइन भू-राजकीयदृष्ट्या संवेदनशील भाग टाळून ओमान आणि संयुक्त अरब अमिराती मार्गे अरबी समुद्रातून भारतात येईल. या पाइपलइनद्वारे भारताला ओमानसह सौदी अरब, इराण, कतार आणि तुर्कमेनिस्तान यांसारख्या वायू साठा संपन्न देशांकडून गॅस मिळवता येईल. विशेष म्हणजे, ही पाइपलाइन समुद्रसपाटीपासून ३,४५० मीटर खोलीवर बिछवली जाऊ शकते, ज्यामुळे ती जगातील सर्वात खोल समुद्री पाइपलाइनपैकी एक ठरेल.

२८ फेब्रुवारी रोजी इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हवाई हल्ल्यांनंतर इराणने होर्मुझ समुद्रधुनी जवळपास बंदच केली आहे. यामुळे जागतिक ऊर्जा बाजार विस्कळीत झाला आहे.

इराणला जेरीस आणण्यासाठी अमेरिकेनेही इराणची नौदलाद्वारे नाकेबंदी केली आहे. अशा परिस्थितीत, होर्मुझवर अवलंबून न राहता गॅसचा अखंड पुरवठा व्हावा यासाठी भारताचा हा निर्णय अत्यंत धोरणात्मक मानला जात आहे.

## भारताने शांततेसाठी भूमिका घ्यावी, स्वागत करू
### इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांची साद

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- ब्रिक्स सदस्य देशांच्या दोन दिवसीय शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी रशिया, इराणचे परराष्ट्र मंत्री भारतात आहेत. अमेरिका इराण युद्ध, जागतिक तेल संकट, रशिया युक्रेन युद्ध अशा मुद्द्यांमुळे ही शिखर परिषद महत्त्वाची ठरत आहे. यातच इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी भारताची भूमिका महत्त्वाची असून, आम्ही स्वागत करू, असे म्हटले आहे.

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी सांगितले की, इराणशी संबंधित कोणत्याही मुद्द्यावर लष्करी कारवाई हा तोडगा असू शकत नाही. इराण एका अकारण आक्रमणाचा बळी ठरला आहे. जर समोरची बाजू गंभीर असेल, तर आम्ही चर्चेसाठी तयार आहोत. अमेरिकेवर विश्वास न ठेवण्याची आमच्याकडे सर्व कारणे आहेत. ते त्यांचे कोणतेही उद्दिष्ट साध्य करू शकलेले नाहीत. या प्रदेशात शांततेसाठी भारत जी कोणतीही भूमिका बजावू शकेल, त्याचे आम्ही स्वागत करू, असे अराघची यांनी म्हटले आहे.

अराघची यांनी शुक्रवारी नवी दिल्लीत एका पत्रकार परिषदेत सांगितले की, कदाचित पुन्हा लढाई सुरू होईल, पण आम्ही मुत्सद्देगिरीसाठीही तयार आहोत. अमेरिकेकडून येणाऱ्या अविश्वास आणि परस्परविरोधी संदेशांमुळे सध्याच्या चर्चेत अडथळा येत आहे. मला आशा आहे की अखेरीस मुत्सद्देगिरीचाच विजय होईल. इराणने कधीही अण्वस्त्रांची मागणी केलेली नाही. ते आमचे धोरण नाही, असेही त्यांनी नमूद केले. आमचा अमेरिकेवर अजिबात विश्वास नाही. कोणत्याही राजनैतिक प्रयत्नांमधील हा सर्वात मोठा अडथळा आहे, असेही अराघची यांनी स्पष्ट केले.

आमच्याविरुद्ध पुकारल्या गेलेल्या एका अत्यंत क्रूर युद्धात निकराने लढा दिला आहे. त्यांना (अमेरिकेला) आपली कोणतीही उद्दिष्टे साध्य करता आली नाहीत. हे स्पष्ट आहे की, ज्या गोष्टी त्यांना लष्करी बळावर साध्य करता आल्या नाहीत, त्या गोष्टी त्यांना वाटाघाटींच्या मेजावरही साध्य करता येणार नाहीत. अर्थात, जोपर्यंत दोन्ही पक्षांचा फायदा होईल असा एखादा तोडगा निघत नाही, असेही अराघची यांनी सांगितले.

दरम्यान, सध्या युद्धविराम लागू आहे. परंतु, परिस्थिती खूप अस्थिर आहे. असे असले तरी युद्धविराम टिकवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. जेणेकरून राजनैतिक चर्चेला संधी मिळू शकेल. त्यांनी आमची वारंवार परीक्षा घेतली आहे. आम्ही कोणत्याही दबावाला किंवा धमक्यांना कधीही बळी पडत नाही. आम्ही कोणत्याही निर्बंधांनाही विरोध करतो. इराणी जनतेला केवळ आदराचीच भाषा समजते, असे अब्बास अराघची यांनी म्हटले आहे.

## अखेर देशभरात पेट्रोल ३ रुपयांनी तर डिझेल ३.११ रुपयांनी महागले




नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर देशभरात पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढले आहेत. पेट्रोल ३ रुपये प्रति लीटर आणि डिझेल ३.११ रुपये प्रति लीटर इतके महागले आहे. गेल्या काही दिवसांपासून, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑइल) वाढत्या किमतींचा परिणाम लवकरच देशांतर्गत ग्राहकांवर होईल, अशी चर्चा सुरू होती. अखेर, तेल कंपन्यांनी आजपासून इंधनाच्या किमतींमध्ये सुधारणा केली. शुक्रवारी सकाळी ६ वाजल्यापासून, देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ करण्यात आली आहे.

दिल्लीमध्ये, नियमित पेट्रोलचा दर ९४.७७ रुपये प्रति लिटरवरून वाढून ९७.७७ रुपये झाला आहे. डिझेलचा दर ८७.६७ रुपये प्रति लिटरवरून वाढून ९०.६७ रुपये झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमधील चढ-उतार आणि रुपयाचे अवमूल्यन यामुळे ही दरवाढ लागू करण्यात आली आहे. मध्य-पूर्वेकडील संघर्षामुळे इंधनाच्या पुरवठ्यात असलेली कमतरता अद्यापही कायम आहे; ज्याचा थेट परिणाम आता इंधनाच्या किमतींमध्ये दिसून येत आहे. दरम्यान, गेल्या चार वर्षांपासून स्थिर असलेल्या या दरांमध्ये आज लक्षणीय बदल झाला आहे. २८ फेब्रुवारी रोजी इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष उफाळून आला असूनही, सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किरकोळ दरांमध्ये वाढ करणे दीर्घकाळापर्यंत टाळले होते; तथापि, तेल कंपन्यांना होत असलेल्या तोट्याच्या पार्श्वभूमीवर, सरकारने अखेर इंधनाचे दर वाढवण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान गेल्या रविवारी, सध्याच्या संकटाची दखल घेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी परकीय चलन वाचवण्याच्या उद्देशाने काही उपाययोजना करण्याचे आवाहन केले होते. यामध्ये इंधनाचा काटकसरीने वापर करणे, सोन्याची खरेदी पुढे ढकलणे आणि परदेश प्रवास स्थगित करणे यांसारख्या गोष्टींचा समावेश होता. रुपयाच्या मूल्यात मोठी घसरण झाली असून, सध्या अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य ९५ च्या पातळीच्या खाली घसरले आहे.

## मान्सून २६ मे रोजी केरळात दाखल होणार, हवामान खात्याचा अंदाज

पुणे दि.१५ (प्रतिनिधी)- उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार २६ मे रोजी मान्सून केरळ किनारपट्टीवर पोहोचू शकतो. यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आयएमडीच्या माहितीनुसार, पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेटांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. १६ मेच्या आसपास मान्सून अंदमान परिसरात दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर २६ मे रोजी मान्सून केरळात दाखल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. त्याचबरोबर ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील काही राज्यांमध्ये पुढील ४ ते ५ दिवस मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तामिळनाडू, केरळ, पुद्दुचेरी आणि दक्षिण कर्नाटकात जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १३ ते १९ मे दरम्यान ईशान्य भारतात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. काही भागांत ताशी ५० ते १०० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने त्याचा परिणाम पुढील काही दिवस देशातील हवामानावर दिसून येणार असल्याचे ने स्पष्ट केले आहे.

## काजू, आंबा उत्पादक आंदोलक शेतकऱ्यांना मुंबई पोलिसांनी फरफटत नेले

मुबई दि.१५ (प्रतिनिधी)- स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात आज (१५ मे) मुंबईत काजू आणि आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी एल्गार करण्यात आला. या आंदोलनात शेतकऱ्यांसाठी सर्व विरोधक एकटवले. मात्र, मोर्चाला परवानगी नसल्याचे सांगत मुंबई पोलिसांनी मोर्चेकऱ्यांना फरफटत नेत गाडीत कोंबले. राजू शेट्टी यांना फरफटत नेण्यात आले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, महादेव जानकर यांच्यासह मराठी भाषा केंद्राचे दीपक पवार यांनाही उचलून नेले. यंदा काजू आणि आंबा या दोन्ही फळ पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.याचबरोबर केंद्र सरकारने साखर आणि कांद्यावर लादलेल्या निर्यातबंदीचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. हा मोर्चा गिरगाव चौपाटीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या निवासस्थानाकडे जाणार होता. आंदोलकांनी निषेध म्हणून रस्त्यावर आंबे फेकून आपला संताप व्यक्त केला.

पोलिसांनी आंदोलकांना शिवालय बंगल्याजवळ रोखले आणि राजू शेट्टी, हर्षवर्धन सपकाळ, महादेव जाणकर, शेखर जयंत पाटील आणि विनायक राऊत यांसारख्या दिग्गज नेत्यांना ताब्यात घेतले. आंदोलकांवर बळाचा वापर आणि धक्काबुक्की झाली. या आंदोलनात शेतकरी संघटनांसोबतच शिवसेना (ठाकरे गट) आणि काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

राजू शेट्टी यांनी पोलिसांच्या कारवाईवर आणि मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेवर तीव्र टीका केली. ते म्हणाले की, आम्ही शिवालयमध्ये जमलेलो होतो. तिथून अचानक पोलीस त्या ठिकाणी आले आणि त्यांनी आम्हाला सांगितलं की तुम्हाला आम्ही ताब्यात घेत आहोत. मी त्यांना विचारलं की जोपर्यंत आम्ही आंदोलन स्थळापर्यंत येत नाही तोपर्यंत तुम्हाला आम्हाला ताब्यात घेण्याचा काही एक अधिकार नाही. तेव्हा त्यांनी उर्मट भाषा केली. बळाचा वापर करून, धक्काबुक्की करून, लाठीचार्ज करून अनेकांना जखमी केलं आहे.

मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेबद्दल बोलताना ते म्हणाले की, गेल्या अडीच महिन्यांपासून कोकणातील शेतकरी आंदोलन करत असताना मुख्यमंत्री चार-पाच वेळा कोकणात आले. कोणाच्या वाढदिवसाला आले, कोणाच्या लग्नाला आले आणि काही खासगी कामासाठी आले, पण अडीच महिन्यांत सातत्याने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्याच्या प्रश्नावर काय त्यांचं म्हणणं आहे? शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन तपासलं असतं, पण साधं निवेदन घेण्याची सुद्धा त्यांनी तसदी घेतली नाही. कोकणातील शेतकरी ५० वर्षांत पहिल्यांदा मुंबईत आला होता. मुख्यमंत्र्यांनी पोलीस खाक्या दाखवला, याचा आम्ही धिक्कार करतो आणि याची किंमत निश्चितच मुख्यमंत्र्यांना चुकवावी लागेल, असा इशारा दिला.

## पुढील वर्षापासून नीट परीक्षा संगणक-आधारित; शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची घोषणा

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज नीट पेपरफुटी प्रकरणासंदर्भात पत्रकार परिषद घेतली. त्यांनी सांगितले की विद्यार्थ्यांचे कल्याण हे सरकारचे प्राधान्य आहे. काही लोक सोशल मीडियावर चुकीची माहिती पसरवत आहेत. पत्रकार परिषदेदरम्यान, धर्मेंद्र प्रधान यांनी पुढील वर्षापासून नीट परीक्षेत मोठ्या बदलांची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, पुढील वर्षापासून नीट परीक्षा ओएमआर शीटऐवजी संगणक-आधारित असेल. त्यांनी पुढे सांगितले की, नीट-यूजी पुनर्परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे शहर निवडायला एक आठवड्याचा वेळ मिळेल. प्रवेशपत्रे १४ जूनपर्यंत जारी केली जातील.

धर्मेंद्र प्रधान म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या भविष्याची चिंता हे सरकारचे प्राधान्य आहे." एनटीए परीक्षा ३ मे रोजी झाली होती. ७ मे रोजी, एनटीएला असा आक्षेप प्राप्त झाला की, या वर्षीच्या प्रश्नपत्रिकेत अंदाजपत्रिकेतील काही प्रश्न आले आहेत. एनटीए आणि सरकारने तत्काळ या प्रकरणाची चौकशी केली. शासकीय यंत्रणांशी संपर्क साधण्यात आला. जेव्हा हे स्पष्ट झाले की यावेळी प्रश्नपत्रिका फुटली आहे, तेव्हा शिक्षण माफियांच्या कटामुळे गुणवंत विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होऊ नये, असे आम्हाला वाटले. त्यामुळे, आम्ही १२ मे रोजीची परीक्षा रद्द केली.

ते पुढे म्हणाले, "आम्ही आज परीक्षेची नवीन तारीख जाहीर केली आहे. हा परीक्षा माफिया आणि समाजकंटकांविरुद्धचा दीर्घकालीन लढा आहे. सरकारने तपास सीबीआयकडे सोपवला आहे. सीबीआयने कारवाई सुरू केली असून, यावेळी सीबीआय कठोर कारवाई करेल. सर्व विभागांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे. यावेळी आम्ही कोणतीही अनियमितता खपवून घेणार नाही. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या सर्वोत्तम हितासाठी घेण्यात आला आहे."

## अमेरिकेशी व्यापारासाठी नव्हे, तर अदानींना संकटातून बाहेर काढण्यासाठी करार; राहुल गांधींकडून पंतप्रधान मोदींवर 'डील'चा आरोप



नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- भारतीय उद्योजक आणि अदानी उद्योगसमूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्याविरोधात दाखल केलेले लाचखोरी आणि भ्रष्टाचाराचे आरोप मागे घेण्याची अमेरिकेच्या न्याय विभागाची योजना असल्याची माहिती आहे. लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. "पंतप्रधानांनी अमेरिकेसोबत केलेला करार हा व्यापार वृद्धीसाठी नसून, अदानींना कायदेशीर कचाट्यातून सोडवण्यासाठी केलेली 'डील' आहे," असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

'द न्यूयॉर्क टाइम्स'ने दिलेल्या एका वृत्तानुसार, अमेरिकेचा न्याय विभाग गौतम अदानी यांच्यावरील फसवणुकीचे आरोप मागे घेण्याच्या तयारीत आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये अमेरिकेतील सरकारी वकिलांनी अदानी, त्यांचा पुतण्या सागर अदानी आणि इतर सहा जणांविरुद्ध लाचखोरी आणि फसवणुकीचे आरोप निश्चित केले होते. मात्र, ट्रम्प प्रशासनाच्या बदलत्या धोरणांमुळे आता हे खटले मागे घेतले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जो बायडेन अमेरिकेचे अध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या काही आठवड्यांमध्ये अदानींविरोधात अमेरिकी करदात्यांचा पैसा वापरून लाचखोरी, भ्रष्टाचार आणि घोटाळा केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. मात्र, गेल्या काही आठवड्यांमधील घडामोडींनंतर हे आरोप मागे घेण्याचा निर्णय झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

या वृत्ताचा आधार घेत राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म " वर पोस्ट केली आहे. त्यांनी म्हटले की, "लाचखोरीच्या प्रकरणात अडकलेल्या पंतप्रधानांनी कोणताही व्यापार करार केला नसून, अदानींच्या सुटकेसाठी सौदा केला आहे."

## गौतम अदानींचे एवढ्या आक्रमकपणे संरक्षण का?; विजय वडेट्टीवार यांचा केंद्राला सवाल

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- सुप्रसिद्ध उद्योगपती गौतम अदानी यांच्यावरील अमेरिकेतील आरोप मागे घेण्याच्या मुद्यावर राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी केंद्रावर जोरदार हल्ला चढवला आहे. गौतम अदानींवरील अमेरिकेतील आरोप मागे घेण्यात आले, तर त्यामुळे क्रोनी कॅपेटलिझमची धोकादायक जागतिक व्याप्ती उघड होईल, असे ते म्हणालेत. गौतम अदानींवर अमेरिकेत २६५ दशलक्ष डॉलर्सची कथित आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. पण आता अमेरिकेने हा खटला मागे घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. ते एका पोस्टमध्ये म्हणाले, गुंतवणुकीच्या वाटाघाटींनंतर अमेरिकन अधिकारी गौतम अदानी यांच्यावरील आरोप मागे घेण्याचा विचार करत असल्याच्या बातम्या खऱ्या असतील, तर त्यामुळे क्रोनी कॅपेटलिझमची धोकादायक जागतिक व्याप्ती उघड होते. 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' असे वचन देणाऱ्या सरकारने उत्तरदायित्वाला केवळ एक प्रसिद्धीचा खेळ बनवले आहे. अनेक वर्षे, भारतात अदानी यांच्यावर उपस्थित केलेला प्रत्येक प्रश्न 'राष्ट्रविरोधी' म्हणून फेटाळला जात होता. आज जग तेच प्रश्न विचारत आहे, जे विरोधी पक्ष अनेक वर्षांपासून विचारत आहेत: एका उद्योगपतीचे इतक्या आक्रमकपणे संरक्षण कोण करते? आणि का? ही अशा व्यवस्थेची गोष्ट आहे जिथे सत्ता विशेषाधिकारांचे रक्षण करते, तर सामान्य नागरिक न्याय, नोकरी आणि जगण्यासाठी संघर्ष करत आहेत, असे ते म्हणाले.

## नीट पेपरफुटीचा मास्टरमाईंड सापडला, पुण्यातील सेवानिवृत्त प्राध्यापक पी व्ही कुलकर्णीला अटक

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटीचा मास्टरमाईंड सीबीआयच्या ताब्यात आला असून पी व्ही कुलकर्णी असं त्याचं नाव आहे. सीबीआयने कुलकर्णीला लातूरमधून ताब्यात घेतलं असून तो एनटीएशी संबंधित असल्याचंही समोर आलं आहे. ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेचा पेपर आधीच फुटल्याचं समोर आल्यानंतर ती परीक्षा रद्द करण्यात आली आहे.

नीट पेपरफुटीच्या प्रकरणात आतापर्यंत अनेकजणांना ताब्यात घेण्यात आलं आहे. पण त्याचा मास्टरमाईंड आता सीबीआयच्या ताब्यात आला आहे. पी व्ही कुलकर्णी हा पुण्यात केमेस्ट्रीचा प्राध्यापक म्हणून काम करायचा अशी माहिती समोर आली आहे. कुलकर्णी हा एनटीएशी संबंधित असून त्यानेच पेपर फोडल्याची माहिती आहे.

नीट पेपरफुटीचं महाराष्ट्र कनेक्शन समोर आल्यानंतर आता लातूरही सातत्यानं सीबीआयच्या रडारवर आहे. दोन दिवसांपूर्वी लातूरमध्ये झालेल्या तपास आणि चौकशीनंतर पी व्ही कुलकर्णीला ताब्यात घेण्यात आलं आहे.

कुलकर्णी हा चार वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाला असल्याची माहिती आहे. पुण्यात ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारेच्या तो संपर्कात असल्याचंही समोर आलं आहे. याच धाग्यावरून सीबीआयचे पथक लातूरपर्यंत पोहोचले. त्यानंतर कुलकर्णीची सखोल चौकशी करण्यात आली. लातूरच्या कैलासनगर मधील कुलकर्णीच्या घराला सध्या कुलूप असून त्याचे कुटुंब पुण्यात राहत असल्याची माहिती आहे. सीबीआयचे दुसरे पथक अद्याप लातूरमध्ये ठाण मांडून आहे. दरम्यान, लातूरमधील सुतमील परिसरातील खासगी क्लास चालकाच्या घरी सीबीआयनं ११ तास तपासणी केली. यावेळी क्लास चालकाच्या घरातून काही कागदपत्रंही जप्त करण्यात आली आहेत. सीबीआयने या प्रकरणात आतापर्यंत सात जणांना अटक केली आहे. त्यापैकी पाच जणांना, राजस्थानचा मंगीलाल बिनवाल, जामवारामगडचा त्याचा भाऊ दिनेश बिनवाल, मुलगा विकास बिनवाल, हरियाणाच्या गुरुग्रामचा यश यादव आणि नाशिकचा शुभम खैरनार यांना दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सर्व पाच आरोपींना सात दिवसांची कोठडी सुनावली आहे. याशिवाय, सीबीआयने पुण्यातून ब्युटिशियन मनीषा वाघमारे आणि नाशिकमधून धनंजय लोखंडे यांनाही अटक केली आहे.

## शिवसेना पक्ष आणि चिन्हाची पुढील सुनावणी ३० जुलै रोजी होणार

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाशी संबंधित याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज (१५ मे) सुनावणी पार पडली. आजच्या या सुनावणीत सरन्यायाधीश सुर्यकांत यांनी ठाकरेंचे वकील देवदत्त कामत यांना चांगलेचं सुनावले.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील वकिलांनी प्रकरणाची लवकर सुनावणी घेण्याची विनंती न्यायालयाकडे केली. सुनावणीदरम्यान वकिलांनी प्रकरण प्रलंबित असल्याने त्यावर तातडीने सुनावणी होणे आवश्यक असल्याचे नमूद केले. त्यावर सरन्यायाधीशांनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया देताना नाराजी व्यक्त केली. सर्वप्रथम तुम्ही तुमच्या लोकांना माध्यमांमध्ये जाऊन सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत नाही असे बेजबाबदार विधान करण्यापासून थांबवा," असे सरन्यायाधीशांनी सुनावणीदरम्यान म्हटले.. तसेच शिवसेना पक्ष चिन्ह प्रकरणी पुढील सुनावणी ३० जुलै रोजी होईल, असं सर्वोच्च न्यायालयाकडून सांगण्यात आले.

## केंद्र सरकार कांद्याची खरेदी करणार; मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- राज्यात कांद्याचे दर कोसळल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. आखाती देशातील युद्ध, निर्यात बंदी आणि निसर्गाच्या प्रकोपामुळे कांद्याचा खर्चही निघत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आज प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने कांद्याला किमान २ ते ३ हजार हमीभाव द्यावा तसेच प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान द्यावे. नाफेडमार्फत कांदा खरेदी सुरू करावी. केंद्र सरकारशी समन्वय साधून दीर्घकालीन स्थिर निर्यात धोरण लागू करावेत, अशा अनेक मागण्या शेतकऱ्यांकडून केल्या जात आहे. तसेच विरोधकांनीही याच मुद्द्यावर बोट ठेवत सरकारवर टीका केली आहे. एकंदरीत या सर्व पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली आहे.

यावेळी बोलताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले कि, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह यांना विनंती केली आहे कि, आमचा कांद्याचा शेतकरी प्रचंड अडचणीत आहे, अनेक शेतकरी कांद्याला एक रुपये भाव मिळतो म्हणून कांदे फेकून द्यायला निघाले आहेत. म्हणून मी कृषीमंत्री शिवराज सिंह चौहानांना सांगितलं, काही झालं तरी कांदा विकत घ्या, कांद्याचं शेल्फ लाईफ जास्त नाही. त्याची खरेदी, साठवणूक करुन तो पुन्हा बाजारात आणायचा, हे सगळं अडचणीचं असतं. पण आपल्या विनंतीला मान देऊन आजपासून महाराष्ट्रात शिवराज सिंह चौहान आणि पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वात १२ रुपये ३५ पैशांनी कांद्याची खरेदी सुरु होत आहे. हा कांद्याच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा ठरेल. अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यानी दिली आहे. सातारा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण कार्यक्रम सोहळ्यासाठी उपस्थिती लावली. यानंतर प्रधानमंत्री आवास योजनेच्या आणि घरकुल लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रमातही ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी हि घोषणा केली आहे.

## माजी भाजपा आमदार कुलदीप सेनगरची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्याचा हायकोर्टाचा निर्णय सुप्रिम कोर्टाकडून रद्द

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- उन्नाव बलात्कार प्रकरणात माजी भाजपा आमदार कुलदीप सिंह सेनगर याच्या जन्मठेपेच्या शिक्षेला स्थिगती देणारा दिल्ली उच्च न्यायालयाचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी रद्द केला. २०१७ मधील या बलात्कार प्रकरणाची नव्याने सुनावणी घेण्याचे निर्देश उच्च न्यायालयाला दिले आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने याबाबत निर्णय दिला आहे.

"सेनगरची शिक्षा आणि जन्मठेपेविरुद्धच्या अपिलावर दोन महिन्यांच्या आत निर्णय देण्याचे प्रयत्न करण्याचे निर्देश सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती बागची यांच्या खंडपीठाने दिले (पान ४ वर)

## काही बेरोजगार तरुण झुरळांप्रमाणे व्यवस्थेवर हल्ला करतात; सरन्यायाधीश सूर्यकांत

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी देशातील काही बेरोजगार तरुणांची तुलना 'झुरळांशी' केली. "काही बेरोजगार तरुण झुरळांप्रमाणे व्यवस्थेवर हल्ला करतात", अशा शब्दात सरन्यायाधीशांनी ताशेरे ओढले. "असे तरुण पुढे जाऊन माध्यमं, समाज माध्यमं आणि माहिती अधिकार (आरटीआय) कार्यकर्ते बनतात आणि व्यवस्थेवर हल्ले करू लागतात", असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी शुक्रवारी नोंदवले, असे वृत्त पीटीआय या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे.

पीटीआयच्या वृत्तानुसार, सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर एका याचिकेवर सुनावणी सुरू होती. एका वकिलाने स्वतःला वरिष्ठ वकील म्हणून नियुक्त करण्याच्या मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करत असताना न्यायालयाने याचिकाकर्त्या वकिलाच्या व्यावसायिक वर्तनावर कडक शब्दात ताशेरे ओढले. समाजात आधीच अनेक परजीवी वावरत असून ते सतत व्यवस्थेला टार्गेट करत असल्याचे भाष्य यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केले.

"समाजात अनेक परजीवी वावरत आहेत, ते सातत्याने व्यवस्थेला लक्ष्य करत असतात. तुम्हाला देखील त्यांचा हात मिळवायचा आहे का?", असा थेट सवाल खंडपीठाने याचिकाकर्त्या वकिलाला विचारला. तसेच, "कदाचित सगळे जगच वरिष्ठ वकील पदासाठी पात्र ठरेल. पण, किमान तुम्ही तरी या पदासाठी पात्र नाहीत", असा शब्दात खंडपीठाने वकिलाला खडसावले. "दिल्ली उच्च न्यायालयाने जरी वरिष्ठ वकील म्हणून नियुक्ती केली असती तरी तुमचे व्यावसायिक वर्तन पाहता सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय रद्द केला असता", असेही न्यायालयाने पुढे स्पष्ट केले.

# जागतिक संघर्षासोबत अर्थव्यवस्थेची घसरण

आखाती युद्ध केवळ भूराजकीय संघर्ष नसून जागतिक अर्थव्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारे संकट ठरते. तेलाच्या किमतींपासून रोजगारापर्यंत प्रत्येक स्तरावर त्याचे परिणाम दिसून येतात. अशा वेळी दीर्घकालीन उपाययोजना, पर्यायी ऊर्जा स्रोतांचा विकास, आर्थिक स्वावलंबन आणि स्थिर धोरणे यांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. अन्यथा, प्रत्येक जागतिक संघर्षासोबत अर्थव्यवस्थेची हीच घसरण पुन्हा पुन्हा अनुभवावी लागेल.

आखाती प्रदेशातील युद्ध हे केवळ दोन-तीन देशांपुरते मर्यादित राहात नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. तेलसंपन्न आखाती देश जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे केंद्र असल्यामुळे तेथील अस्थिरता ही थेट आर्थिक अस्थिरतेत रूपांतरित होते. अशा युद्धपरिस्थितीत सर्वप्रथम फटका बसतो तो कच्च्या तेलाच्या किमतींना. तेलाच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या की वाहतूक, उत्पादन, वीजनिर्मिती अशा सर्वच क्षेत्रांवर परिणाम होतो आणि महागाईचा भडका उडतो. भारतासारख्या तेलआयात-निर्भर देशासाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरते. आयातीवरील खर्च वाढल्याने चालू खाते तुटीवर ताण आता येतो, रुपयाचे अवमूल्यन होते आणि सरकारसमोर आर्थिक संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहते. पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशावर थेट परिणाम होतो, तर उद्योगक्षेत्रासाठी उत्पादनखर्च वाढतो. परिणामी, बाजारातील मागणी घटते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट कंपन्यांच्या नफ्यावर मोठा परिणाम दिसून येतो. उत्पादनखर्च वाढणे, कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होणे आणि जागतिक मागणीत घट होणे या कारणांमुळे कंपन्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी होते. अनेक कंपन्यांना खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतात. त्यात नवीन प्रकल्पांना स्थगिती देणे, विस्तार योजनांना ब्रेक लावणे किंवा कर्मचाऱ्यांची कपात करणे यांचा समावेश असतो. अशा परिस्थितीत कॉर्पोरेट क्षेत्राची जोखीम घेण्याची क्षमता कमी होते आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचे निर्णय पुढे ढकलले जातात. असे गंभीर परिणाम होत असल्याने परिस्थितीचा वेध घ्यायला हवा.

युद्धामुळे निर्माण झालेली अनिश्चितता ही गुंतवणूकदारांसाठी सर्वात मोठा अडथळा असते. देशांतर्गत तसेच परदेशी गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. शेअर बाजारात चढ-उतार वाढतात. भांडवली बाजारातील विश्वास कमी होतो आणि नवीन गुंतवणुकीचा ओघ मंदावतो. परकीय गुंतवणूक घटल्यास तंत्रज्ञान हस्तांतरण, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक वाढ यांवरही नकारात्मक परिणाम होतो. या सर्व प्रक्रियेचा फटका बसतो तो रोजगार क्षेत्राला. उद्योगांमध्ये उत्पादन कमी झाले, गुंतवणूक थांबली आणि नफा घटला की कंपन्या सर्वप्रथम मनुष्यबळावर गदा आणतात. नवीन भरती थांबते, कंत्राटी कर्मचाऱ्यांची कपात होते आणि काही वेळा कायमस्वरूपी नोकरकपातही केली जाते. सेवाक्षेत्रातही याचा परिणाम जाणवतो, कारण ग्राहकांचा खर्च कमी झाल्याने व्यवसायांवर ताण वाढतो. परिणामी मध्यमवर्गीय तसेच निम्नवर्गीय कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटते. युद्धाचा परिणाम केवळ थेट आर्थिक आकड्यांपुरता मर्यादित राहत नाही, तर समाजाच्या मानसिकतेवरही परिणाम करतो. अनिश्चिततेमुळे लोक खर्च करण्यापेक्षा बचतीकडे वळतात. त्यामुळे बाजारातील मागणी आणखी घटते. हीच साखळी अर्थव्यवस्थेच्या मंदीला अधिक गती देते. जागतिक स्तरावर व्यापारमार्गांमध्ये अडथळे निर्माण झाल्यास निर्यात-आयात व्यवहारांवरही परिणाम होतो आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेलाच धक्का बसतो. अशा परिस्थितीत सरकारसमोर मोठे आव्हान उभे राहते. महागाई नियंत्रणात ठेवणे, आर्थिक वाढ टिकवून ठेवणे आणि रोजगारनिर्मितीला चालना देणे या तिन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करणे कठीण होते.

यातून वित्तीय तूट वाढण्याचा धोका निर्माण होतो, तर सामाजिक कल्याण योजनांवरील खर्च वाढवण्याची गरजही भासते. त्यामुळे आर्थिक धोरणे आखताना संतुलन साधणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. पश्चिम आशियातील इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल यांच्यातील भीषण संकटाच्या छाया आता भारतीय अर्थव्यवस्थेवर पडू लागल्या आहेत. या युद्धाचा फारसा परिणाम होणार नाही आणि आम्ही विशेष काळजी घेतली आहे, असे केंद्र सरकारतर्फे सांगण्यात येत असले, तरी इतर देशांप्रमाणे भारतावरही विपरीत परिणाम होणार आहे, हे स्पष्ट आहे. 'मूडीज' या जागतिक पतमानांकन संस्थेने २०२६-२७ साठी भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या, म्हणजेच जीडीपीच्या वाढीचा अंदाज ६.८ टक्क्यांवरून ६ टक्के इतका खाली आणला आहे. याचे कारण या युद्धामुळे होर्मुझ खाडीमधील वाहतूक अनेक देशांसाठी बंद झाली आणि अन्यत्रही क्षेपणास्त्र हल्ले सुरू असल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली. भारताला लागणाऱ्या एकूण कच्च्या तेलापैकी ५५ आणि एलपीजीपैकी ९० टक्क्यांपेक्षा जास्त पुरवठा याच युद्धग्रस्त भागातून होतो. खतांच्या आयातीवर परिणाम झाल्यामुळे खाद्यपदार्थांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे २०२४-२५ मध्ये २.४ टक्के असलेली सरासरी महागाई आता ४.८ टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. यापूर्वी, म्हणजे १९७३ मध्ये तेल निर्यातदार राष्ट्रांनी अचानकपणे इंधनाचे दर वाढवल्यामुळे भारतावर महासंकट कोसळले होते. त्यावेळी याच्या परिणामी, तसेच सातत्याच्या दुष्काळामुळे भाववाढीचे संकट कोसळले होते.

आजघडीला भारताची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली आहे. अन्नधान्याची टंचाई केव्हाच दूर झाली आहे. परंतु तरीही आताचा काळ जागतिकीकरणाचा असल्यामुळे पूर्वीपेक्षा आता युद्धजन्य स्थितीचे फटकेही जास्त बसण्याची शक्यता असते. याचे कारण परदेशांतून भारतात येणाऱ्या पैशांपैकी ४० टक्के वाटा हा आखाती देशातून येतो. त्याचप्रमाणे उदारीकरणानंतर जागतिक व्यापारातील भारताचा हिस्सा हळूहळू वाढत आहे आणि वेगवेगळ्या वस्तूंची व सेवांची निर्यात भारत करू लागला आहे. युद्धाच्या वणव्यामुळे अमेरिकेतील इंधनदराने सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. युद्धापूर्वी तीन डॉलर प्रति गॅलनच्या खाली असलेले पेट्रोल दर चार डॉलरच्या पार गेले. तर मालवाहतुकीसाठी कणा मानल्या जाणाऱ्या डिझेलच्या किमतीत युद्ध सुरू झाल्यापासून ४७ टक्क्यांची वाढ झाली आणि त्याचे दर ५.५०डॉलर प्रति गॅलनपर्यंत पोहोचले. युरिया आणि खतांच्या किमती वाढल्याने अमेरिकन शेतकऱ्यांवर सुमारे ५० हजार डॉलर्सचा अतिरिक्त बोजा पडला आहे. त्याचप्रमाणे कम्प्युटर चिप्स बनवण्यासाठी लागणाऱ्या हेलियम वायूचा ३५ टक्के पुरवठा कतारमधून होतो. हा पुरवठा थांबल्याने सिलिकॉन व्हॅलीतील टेक कंपन्यांवर मोठे संकट कोसळले आहे. रुग्णालयातील एमआरआय उपकरणासाठी हेलियम अनिवार्य असतो, ज्याची टंचाई आता दूर व्हायला हवी. होर्मुझची नाकेबंदी अधिक काळ सुरू राहिल्यास अमेरिकेमध्ये मंदी येणे अटळ आहे. अमेरिकेचा २०२६ मधील विकासदर २.६ टक्क्यांवरून थेट एक टक्क्यावर येण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. याचा अर्थ अमेरिका पुन्हा एकदा १९७०च्या दशकातील 'स्टॅगफ्लेशन'सारख्या परिस्थितीत पोहोचू शकते. अशा परिस्थितीत विकासदर कमी आणि महागाई जास्त असते. शिवाय युद्ध थांबले तरी बंद झालेल्या तेलविहिरी पुन्हा सुरू होण्यासाठी अनेक महिने लागतात. तसेच युद्धात उद्ध्वस्त झालेल्या पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीला काही वर्षे लागू शकतात. त्यामुळे इंधन दर पूर्वीच्या स्तरावर येथे येण्याची शक्यता कमीच आहे. अमेरिकेची स्थिती अशी राहिल्यास भारतासारख्या मोठी अर्थव्यवस्था असलेल्या देशांनाही चटके बसणार, हे स्पष्ट आहे. वास्तविक, यापूर्वी देशांतर्गत अर्थव्यवस्थेमध्ये पैशांचा ओघ वाढला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, सर्वसामान्य नागरिक असो वा मोठे उद्योग समूह, आपल्या गरजा आणि विस्तारासाठी बँकांकडे कर्ज मागणाऱ्यांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. देशातील ९५ टक्के बाजारपेठ व्यापणाऱ्या ४१ प्रमुख बँकांकडून गोळा केलेल्या माहितीनुसार, उद्योगांना देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये मोठी झेप पाहायला मिळाली आहे. गेल्या वर्षी उद्योगांची कर्जवृद्धी केवळ साडेसाते टक्के होती. ती आता वाढून १३.५ टक्के झाली आहे. पायाभूत सुविधा अभियांत्रिकी, रसायने, पेट्रोलियम आणि कापड उद्योगांतून कर्जाची सर्वाधिक मागणी दिसून आली आहे. या क्षेत्रात १६.१६ टक्के वाढ झाली असून, प्रामुख्याने एनबीएफसी आणि कमर्शियल रियल इस्टेट क्षेत्राकडून मोठी मागणी आली आहे. वैयक्तिक कर्ज विभागात १५ टक्क्यांची वाढ झाली आहे गृहकर्जामध्ये स्थिरता दिसत असली, तरी वाहनकर्ज आणि गोल्ड लोन घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे.

# !! एकेक शिवार फेरी: आनंददायी लहरी!!

### (१६ मे : जागतिक कृषी पर्यटन दिवस)

गावाकडच्या मोकळ्या वातावरणात शेतीतील कामे पाहणे, अनुभवणे आणि ग्रामीण संस्कृतीचा आस्वाद घेणे पर्यटकांसाठी खास आकर्षण ठरते. पर्यटकांचा ओढा याकडे दिवसेंदिवस वाढत असल्याने कृषी पर्यटनाचा उद्योग अनेक जिल्ह्यांमध्ये उद्योग क्षेत्र म्हणून उभा राहत आहे. १६ मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. अत्यंत आपुलकीचा आणि रोचक असा संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दातून अभ्यासा... संपादक.




शहरातील काँक्रिटच्या जंगलातील लोक निसर्गाचे सान्निध्य शोधत असतात. याच नावीन्याच्या शोधात असणाऱ्यांना कृषी पर्यटन केंद्र उत्तम पर्याय म्हणून नावारुपास आले आहे. शेती, निसर्गरम्य वातावरण आणि ग्रामीण जीवन यातील एक वेगळा अनुभव घेण्याची संधी म्हणजे कृषी पर्यटन. शेती, ग्रामीण जीवन आणि पर्यटन यांचा समन्वय म्हणजे कृषी पर्यटन. ग्रामीण भागाशी नाळ तुटलेल्या शहरातील नागरिकांना कृषी पर्यटनाच्या रुपाने पुन्हा एकदा गावाकडचे जगणे अनुभवण्याची संधी मिळत आहे. शेती आणि ग्रामीण आर्थिक विकासाला हातभार लावण्यासाठी कृषी पर्यटन हा एक चांगला पूरक व्यवसाय आहे. गावाकडच्या मोकळ्या वातावरणात शेतीतील कामे पाहणे, अनुभवणे आणि ग्रामीण संस्कृतीचा आस्वाद घेणे पर्यटकांसाठी खास आकर्षण ठरते. पर्यटकांचा ओढा याकडे दिवसेंदिवस वाढत असल्याने कृषी पर्यटनाचा उद्योग अनेक जिल्ह्यांमध्ये उद्योग क्षेत्र म्हणून उभा राहत आहे. १६ मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो.

कृषी पर्यटन हे सामान्य पर्यटनाच्या तुलनेमध्ये थोडी नावीन्यपूर्ण संकल्पना आहे. हा शेतीपूरक असा व्यवसाय असून, सामान्य हॉटेलिंग किंवा मनोरंजन पार्कच्या तुलनेमध्ये त्यांचे वेगळेपण लक्षात घेतले पाहिजे. उत्तम शेती पाहणे आणि शेती कामांचा अनुभव, ग्रामीण व नैसर्गिक वातावरण, पाळिव जनावरांशी संबंधित काही कामे यांचा अनुभव लोकांना घेता येतो. स्थानिक व वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थांचा स्वाद घेता येतो. शेतातून ताजी उत्पादने थेट खरेदी करण्याची संधी मिळते. ग्रामीण लोकांचे दैनंदिन जीवन, तसेच सांस्कृतिक घटक आणि परंपरा यांची माहिती मिळते. यातून ग्रामीण आणि शहरी बागांमध्ये समन्वय निर्माण होऊ शकतो.

शेतकऱ्यांना यातून अतिरिक्त उत्पन्नासोबत विविध उत्पादनांना कायमस्वरूपी ग्राहक मिळू शकतात. कुटुंबातील सदस्यांना रोजगाराची संधी मिळते. कृषी पर्यटन हे अनेकांसाठी उत्पन्नाचा चांगला स्रोत झाला असल्याची अनेक उदाहरणे दिसू लागली आहेत. कमीत कमी दोन हेक्टर जमीन, उत्तम शेतघर, पाण्याची उत्तम सोय, एखादा जलस्रोत आणि पर्यटकांना विविध सेवा व मनोरंजन देण्याची इच्छा, थोडा बोलका स्वभाव इतक्या भांडवलावर कोणताही शेतकरी कृषी पर्यटन केंद्र सुरू करू शकतो. वैयक्तिक शेतकरी व्यतिरिक्त कृषी सहकारी संस्था, अशासकीय संस्था, कृषी विद्यापीठे आणि कृषी महाविद्यालये येथील अशी केंद्रे सुरू करता येतात. काही वैशिष्ट्यपूर्ण ग्राम पंचायतींही शेतकऱ्यांच्या मदतीने अशी केंद्रे सुरू करू शकतात. कृषी पर्यटनातील यशासाठी पर्यटन केंद्राचे स्थान हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. केंद्राचे स्थान पोहोचण्यास सोपे आणि चांगली नैसर्गिक पार्श्वभूमीचे असावे. शहरी पर्यटकांना निसर्ग आणि ग्रामीण जीवनाचा आनंद लुटण्यात रस असतो. या केंद्रापर्यंत पोहोचणारे महामार्ग, रस्ते आणि रेल्वे मार्ग असल्यास अधिक उपयुक्त ठरते. कृषी पर्यटनाबरोबरच काही ऐतिहासिक आणि नैसर्गिक पर्यटनस्थळ जवळ असल्यास फायदा होतो.

कृषी पर्यटनाचा जन्म कुठे झाला म्हणाल? तर याबाबत अनेक दावे-प्रतिदावे केले जातात. मात्र साधारणपणे सुमारे ७० वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियामध्ये कृषी पर्यटन या संकल्पनेची व्यावसायिक पातळीवर सुरुवात झाली, असे मानले जाते. ऑस्ट्रेलियासह ब्राझील, न्यूझीलंड, कॅनडा, इटली या देशांमध्येही कृषी पर्यटन पूर्वीपासून मोठ्या प्रमाणात होते. युरोपीय देशांनी तर कृषी पर्यटनाला चालना देऊन त्याला शेतीपूरक व्यवसाय म्हणून मान्यताही दिली आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये या क्षेत्राला एका उद्योग क्षेत्राचा दर्जा मिळाला आहे.

भारतात महाराष्ट्राने सर्वात आधी यास सुरुवात केली आहे. भारतात कृषी पर्यटनाची सुरुवात करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्रात सर्वप्रथम बारामतीतील प्रगतशील शेतकरी स्व.आप्पासाहेब पवार यांचा यात खूप मोठा वाटा आहे. मात्र त्याला व्यावसायिक स्वरुप देवून राज्यात कृषी पर्यटन व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय चंद्रशेखर भडसावळे यांना जाते. चंद्रशेखर भडसावळे यांनी कृषीविषयक शिक्षण घेऊन सन १९८५ साली कृषी पर्यटन केंद्राच्या धर्तीवर सगुना बागेची स्थापना केली. भातशेती शेततळ्यांमधील मत्स्यपालन, नारळ, आंबा, चिकूसारखी फळिपके आणि शेतीविषयक विविध भाजीपाला व इतर पिकांची लागवड केली. त्यानंतर त्याला ॲग्रो टुरिझमचे स्वरुप दिले. आता ही संकल्पना सर्वत्र रुजली आहे. सध्यस्थितीत महाराष्ट्रात ३५० पेक्षा जास्त कृषी पर्यटन केंद्र कार्यरत आहेत. आणि आज महाराष्ट्राच्या २९ जिल्ह्यांमध्ये ही विस्तारलेली कृषी आणि ग्रामीण पर्यटन चळवळ ५२८ कृषी पर्यटन केंद्रापर्यंत गेली आहे. महाराष्ट्रात एकूण कृषी पर्यटन केंद्रावर ती ४,१६७ विदेशी पर्यटकांनी भेट दिलेली आहे. छोट्यातला छोटा शेतकरी असेल किंवा मोठ्यातला मोठा कृषी विद्यापीठ असेल या सर्वांना आता कृषी आणि ग्रामीण पर्यटन केंद्र सुरू करता येऊ शकतात.

कृषी पर्यटन केंद्रावर संपूर्ण नैसर्गिक वातावरण, चुलीवरचे जेवण, जेवणात शेतातील भाजीपाला, बैलगाडीवरती रपेट, शिवार फेरी इत्यादी आनंददायी गोष्टींचा समावेश असतो. शिवार फेरीमध्ये शेतकरी आपल्या शेतावरील पिकांची, विविध वनस्पतींची माहिती पर्यटकांना देत असतो. तसेच पर्यटक हातात नांगर धरून शेतीची नांगरणी, कुळवणी, भात लावणी ते काढणी अशा निरनिराळ्या शेतीकामात सहभाग घेऊन स्वत: आनंद घेत असतात. अलीकडच्या काही दिवसांमध्ये फेसबूक, इन्स्ट्राग्राम, ट्विटरसारख्या अन्य सोशल मीडिया साईट्सवर शेतात काम करणाया तरुण-तरुणींचे फोटो पहायला मिळत आहेत. हे केवळ ॲग्रो टुरिझममुळेच शक्य झाले आहे. शेतावर मुक्काम करून पर्यटक निसर्गाचा अनुभव घेतात. यासाठी ग्रामीण भागातील शैलीची कौलारु घरे, मातीच्या भिंती अशा घरांची निर्मिती केलेली असते. विकेंड टूर म्हणून याला मोठी पसंती मिळतांना दिसत आहे.

कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील अर्थकारणाला मोठी चालना मिळू शकते. अनेक ठिकाणी हे सिध्द देखील झाले आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्याला ठराविक कालावधीतच उत्पन्न मिळते, ते देखील निसर्ग व बाजारपेठेच्या मर्जीवर अवलंबून असते. यामुळे कृषी पर्यटन हा नियमित उत्पन्न देणारा मार्ग आहे. अनेक शेतकरी शेतीतून उत्पादित झालेला सेंद्रिय शेतमाल जागेवरच थेट पर्यटकांना विकून उत्पन्न मिळवत आहेत. याशिवाय ग्रामीण लोककला शहरात पोचवण्याचे हे माध्यम असून गावातच रोजगार मिळवून देण्याचे मुख्य साधन देखील झाले आहे. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शेतमाल विक्रीची थेट बाजारपेठ निर्माण करणे शक्य आहे.

!! आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम; जिल्ह्यातील मतदारांची होणार पडताळणी

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचाही समावेश करण्यात आला असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. ही मोहीम जून ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबवली जाणार आहे.

निवडणूक आयोगाकडून नियुक्त केलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (SIR) प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन त्यांच्या तपशिलाची खातरजमा करणार आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता राहावी यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमलेले बूथ लेव्हल एजंट्स (इङअ) या अधिकाऱ्यांना सहकार्य करणार आहेत.

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा (Field Staff) विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले, जेणेकरून दोन्ही कामांमध्ये सुसूत्रता राखता येईल.

महाराष्ट्रासाठीचे महत्त्वाचे वेळापत्रकमध्ये बीएलओ प्रशिक्षण हे २० ते २९ जून दरम्यान देण्यात येणार आहे. ३० जून ते २९ जुलै २०२६या कालावधीत घरोघरी जाऊन प्रत्यक्ष भेटी देण्यात येणार आहेत.मसुदा मतदार यादी प्रसिद्धी ही ५ ऑगस्ट २०२६ रोजी होईल.यावर दावे व हरकती नोंदवणे साठी ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ दरम्यान दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी प्रसिद्धी दिनांक ७ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट (BLA) नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. राजकीय पक्षांच्या सहभागामुळे मतदार यादीतील दुबार नावे वगळणे, मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक आणि दोषरहित होण्यास मदत होणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात देखील विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम (SIR)ही प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

**तुम्ही अजून हवे होता. अजून माणसांना 'मन' पुरेसं कळलं नाही.**
**ते अजून माणूस व्हायचे होते. तेवढ्यात आपण गेलात.**

# डॉ. आनंद नाडकर्णी एक अद्वितीय पिंपळपान

विस्कटलेल्या मनप्रदेशात, मनमैत्रीचा सकारात्मक अंकुर निपजावा म्हणून तुम्ही अपार कष्ट, परिश्रम घेतला. अजूनही अविरत, अखंड, मनाच्या सेवेसाठी तुमच्यातला 'आनंद' पराकोटीचा उत्साही दिसला. अगणित मनाला शिकविले तुम्ही बोट धरुन चालायला.. इतकेच नाही तर उपचारासोबत खांद्यावर,

कडेवर घेऊन, डोक्यावरुन हात फिरवत, मायेने कुरवाळत, जादूची झप्पी देऊन शहाणे केले तुम्ही अनेक मनाला.. एका सायकीयास्ट्रीस्टची डायरी वाचताना.. इतकी सहिष्णुता, इतकी मानवता स्वतःमध्ये कशी काय तुम्ही रुजवू शकला ! म्हणूनच क्षणोक्षणी बुद्धांसोबत तुम्ही दिसता.. मुक्तांगणामधून अनेकांना दिला व्यसनमुक्तीचा मार्ग नवा इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजिकल हेल्थने मानवी मनाला, उपचारार्थींना दिला स्पर्श जो हवा.. तुमचे शब्द सामर्थ्य, सुस्पष्ट गोड माधाळ वाणी सुंदर शब्दात उलघडता मनोविश्लेषणाची कहाणी अतिशय तळमळीने सुरू केली तुम्ही मानसिक आरोग्याची चळवळ मानसिक आरोग्य कार्यकर्ता म्हणविताना संकटांशी कधीच घेतली नाहीत फारकत 'मनोगतीला' यथायोग्य 'मनोगत' देण्याचा प्रयत्न तुमचा वैयक्तिक आणि सामाजिक मनोस्वास्थ्याचा विकाराकडून विकासाकडे नेणारा वसा तुमचा गुंतागुंतीच्या मानसिक विकारांना हाताळण्याचे तुमच्या ठायी सखोल आधुनिक अद्वितीय ज्ञान उब आणि उमेद देण्याची लोकहिताची तुम्हा जाण. अभ्यासू वृत्ती, अचाट तुमची कल्पनाशक्ती, क्लिष्ट विषय सोपे करून सांगण्याची कला तुमचे वक्तृत्व, जीवंत वाटणारी लिखाण शैली,

जगणे सावरण्याचे भान देते मनामनाला परंपरेतल्या ज्ञानाला तुम्ही वास्तवाशी जोडता ज्ञानेश्वरी, गीता, अध्यात्मिक ज्ञान नव्याने मांडता. समाज मनातल्या अज्ञान, अंधश्रद्धा गैरसमजुतीच्या बेड्या हळूहळू नाहीशा करता ओळखून जनमाणसाच्या नाड्या. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या उन्नत भावनांच्या, मानवी ताऱ्यांच्या तुम्ही घेतल्या अनेक मुलाखती, जगण्याचे बळ धडपडण्याची वृत्ती मिळते अवतीभवती.

मनोविकारशास्त्रामध्ये अनेक संकल्पना राबवून शास्त्राला नव्या परिभाषा तुम्ही दिला. मानसोपचार शास्त्रातील मैलाचे दगड तुम्ही झाला. निषणात तबलावादन, सुरेख चित्रकला, संगीताची जाण अनेक प्रबोधनात्मक विषय देवू केलेत तुम्ही चित्रपटांना वाखाणण्याजोगे नाट्य क्षेत्रातील तुमचे योगदान मानवतेचा अभिमान तुम्ही, करुणेचे एक अद्वितीय पिंपळपान..!

विनम्र आदरांजली
डॉ.सोनिया कस्तुर, विश्रामबाग सांगली

**अतिशय दुःखद बातमी.**


डॉ. आनंद नाडकर्णी यांचे आज १५ मे २०२६ रोजी पहाटे ५ वाजता दुखःद निधन झाले. मागील आठवड्यात झालेल्या शस्त्रक्रियेनंतर तब्येतीसंदर्भात काही गुंतागुंत निर्माण झाली होती. भावपूर्ण श्रद्धांजली.

**-ऋतुजा केळकर**

# मानसोपचाराला सामाजिक बांधिलकी मानून कार्य करणारा दीपस्तंभ निमाला

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांना श्रद्धांजली

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) - मानसोपचाराला सामाजिक बांधिलकी मानून दीपस्तंभासारखे कार्य करणाऱ्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व लेखक डॉ. आनंद नाडकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ. नाडकर्णी यांनी मानसोपचाराला केवळ वैद्यकीय दृष्टिकोनातून पाहिले नाही. त्यांनी त्याला सामाजिक परिस्थितीच्या अभ्यासाची जोड दिली. यातून त्यांनी मानसोपचाराबाबतचा समाजातला पूर्वग्रह दूर करण्यासाठी अनेकविध उपक्रम राबविले. सामाजिक प्रश्नांवर ते संवेदनशीलपणे संशोधन अभ्यास करत उपाय शोधण्यासाठी प्रयत्नशील राहिले. या सगळ्यात ते व्याख्यानांमधून आणि विविध व्यासपीठांवरून सातत्याने बोलत राहिले. त्यासाठी त्यांनी विपुल लेखन केले. लालित्यपूर्ण लेखनशैली हे त्यांचे वैशिष्ट्य राहिले. यामुळे मराठी साहित्यातही त्यांच्या वैविध्यपूर्ण पुस्तक आणि कविता संग्रहाची भर घातली गेली. डॉ नाडकर्णी आयपीएच, मुक्तांगण व अन्य सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ते सक्रियपणे कार्यरत राहिले. त्यांच्या निधनामुळे मार्गदर्शक या सर्व क्षेत्रांना जोडणारा दुवा निखळला आहे. त्यांचे निधन वैद्यकीय, सामाजिक आणि साहित्यिक दृष्ट्या मोठी हानी आहे. डॉ नाडकर्णी यांच्या परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व लेखक डॉ आनंद नाडकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



# ज्ञानेश्वर देविदास राठोड दुःखद निधन

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - शेवगा तांडा येथील ज्ञानेश्वर देविदास राठोड यांचे आज शेवगा तांडा येथे सकाळी पाच वाजता उष्माघाताने दुःखद निधन झाले त्यांच अंत्यविधी दुपारी बारा वाजता करण्यात आला त्यांच्या पश्चात आई-वडील भाऊ पत्नी दोन मुले व एक मुलगी आहे.

# 'आपदा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रम; इच्छुक स्वयंसेवकांना आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात शासनाच्या निर्देशानुसार आपदा मित्रांचे कौशल्य वृद्धिंगत करण्याच्या योजनेंतर्गत (U Scacaling Aada Mitra) आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने हा १२ दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून इच्छुक स्वयंसेवकांची अंतिम बॅच दि. २२ मे रोजी कोलाड, जि. रायगड येथे रवाना करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील इच्छुक स्वयंसेवकांनी आपली नावे नोंदवावी असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जनार्दन विधाते यांनी केले आहे.

हा प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णतः मोफत आहे. सहभागी प्रत्येक आपदा मित्राला वैयक्तिक आपत्कालीन प्रतिसादकर्ता संच (ERK) उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच तीन वर्षांसाठी पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात येणार असून येणे-जाणे, निवास व भोजनाची व्यवस्था शासनामार्फत आणि नियुक्त संस्थेमार्फत विनामूल्य करण्यात येणार आहे.

महिला व मुलींसाठी स्वतंत्र बॅच तसेच प्रवासाची स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशिक्षणासाठी इच्छुक व यापूर्वी नामनिर्देशन सादर केलेल्या स्वयंसेवकांनी आवश्यक कागदपत्रे दि. २० मे पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार कार्ड, टी.सी. किंवा राष्ट्रीयत्वाचा पुरावा, महाविद्यालयाचे ओळखपत्र, पासपोर्ट फोटो तसेच नोकरी करत असल्यास नोकरीचे ओळखपत्र यांचा समावेश आहे. आपदा मित्र निवडीसाठी अर्जदार भारतीय नागरिक असणे आवश्यक असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. संबंधित व्यक्ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावी. वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे ठेवण्यात आली आहे. मात्र माजी सैनिक, डॉक्टर, स्थापत्य अभियंते, शास्त्रज्ञ तसेच आपत्कालीन सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा ५५ वर्षे असेल. तथापि, त्यांना विमा संरक्षण लागू राहणार नाही. या प्रशिक्षणासाठी नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, आशा व अंगणवाडी सेविका, होमगार्ड, पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बल, खासगी सुरक्षा रक्षक तसेच ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, शासकीय महामंडळे, महावितरण, एस.टी. महामंडळ, पोस्ट कार्यालये आणि इतर शासकीय, निमशासकीय व कंत्राटी कर्मचारी पात्र राहणार आहेत.

अधिक माहितीसाठी दीपक राजेंद्र उदावंत (मो. ७०५८०१०४५०) तसेच मोहम्मद अर्शी खान, (मो.९९१०७२८४८७), DDMS, छत्रपती संभाजीनगर (ई-मेल : dddmoaurangabad16@gmail.com) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा प्रशासनाने कळवले आहे.

# योग काळाची गरज - भाऊ सुरडकर



छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - भारतीय योग संस्थान दिल्ली, शाखा छत्रपती संभाजीनगर जिल्हा अंतर्गत दीपनगर सातारा परिसर येथे पाच दिवसीय मोटापा रोग निवारण शिबिराचा समारोप पार पडला. पाच दिवशीय शिबिराचे उद्घाटन उपप्रांतप्रधान डॉक्टर उत्तम काळवणे यांच्या हस्ते झाले. या शिबिरात डॉक्टर अनघा नेवपूरकर, डॉक्टर महेश पाटील, डॉक्टर अनुज भारुका, डॉक्टर सीमा महाजन, डॉक्टर सोनवणे, सौ प्रज्ञा तलवार अशा अनेकांचे मार्गदर्शन लाभले.

शरीराचा आकार आणि वजन वाढण्याचे अनेक कारण व त्यावर काय उपाय करावा याचे देखील मार्गदर्शन झाले. आहार हा रोजचा कसा असावा या संदर्भात देखील माहिती सांगण्यात आली.या पाच दिवसाच्या शिबिरामध्ये साधारणतः २२० लोकांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिराच्या समारोप प्रसंगी नगरसेविका सविता कुलकर्णी समाजसेविका राजपूत उपप्रांतप्रधान डॉक्टर उत्तम काळवणे जिल्हा मंत्री मीना पिसोळे, वैजनाथ डोमाळे, सुनिता डोमाळे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात भाऊ सुरडकर यांनी आज प्रत्येक व्यक्तीला खऱ्या अर्थाने तंदुरुस्त जर राहायचं असेल तर प्रत्येकाने स्वतः साठी एक तास द्यावा रोज नित्यनेमाने योग आसन प्राणायाम ध्यान केल्यामुळे शरीरावरती होणारा चांगला परिणाम हा अनेक समस्या रोग ताणतणाव कमी करण्यासाठी नक्कीच मदत होईल असे पण त्यांनी मांडले. शहरांमध्ये जवळपास ७० ठिकाणी निशुल्क योग केंद्र चालू आहे. नागरिकांचा ओढ हा आता योगाकडून जास्त वाढलेला आहे असे यासमोर प्रसंगी सुरडकर यांनी म्हटले आहे.

शिबिर प्रमुख सतीश कुमार वानखडे, उप शिबीर प्रमुख अलका जोशी, कंचन चंदवानी, सुनीता कावळे, भारती काळमस्कर, शामल जोशी, नीता काळे, शुभांगी कुलकर्णी, कल्पना राजपूत, श्री पाठे सर , श्री वसंतराव शेजोळे, सुमन नवरंगे, अर्चना बुगदे, सुनीता बेलकर, श्यामल जोशी, रमेश जोशी, लक्ष्मण सोनवणे, मुकुंदजी बुगदे यांच्यासह अनेक योगसाधक यामध्ये सहभागी झाले होते. सूत्रसंचालन वर्षा बुगदे यांनी केले.

# भारताच्या संरक्षणासाठी मुंबईत १७ मे रोजी 'श्री राजमातंगी महायज्ञ'

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) - जगावर सध्या तिसऱ्या महायुद्धाचे काळे ढग दाटले असताना, केवळ राजकीय किंवा बौद्धिक स्तरावरील प्रयत्न पुरेसे नसून राष्ट्राला आध्यात्मिक अधिष्ठानाची मोठी गरज आहे. याच उदात्त हेतूने, भारताला अभेद्य आध्यात्मिक संरक्षककवच लाभावे आणि देशाची सर्वांगीण प्रगती होऊन पुन्हा एकदा 'रामराज्या'चा उदय व्हावा, या संकल्पपूर्तीसाठी सनातन संस्थेच्या वतीने मुंबईत 'श्री राजमातंगी महायज्ञा'चे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवारी, १७ मे २०२६ रोजी प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक मंदिराच्या पाठीमागे असलेल्या नर्दुल्ला टँक मैदानावर दुपारी ३.३० ते सायं. ७.३० या वेळेत हा यज्ञ सोहळा अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न होणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. अभय वर्तक यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या वेळी संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ता श्री. चेतन राजहंस, पुरोहित अन् ज्योतिर्विद श्री. श्रेयस पिसोळकर आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे नवी मुंबई समन्वयक श्री. कैलास पाटील उपस्थित होते. हा महायज्ञ केवळ धार्मिक विधी नसून तो राष्ट्ररक्षणाचा एक आध्यात्मिक लढा असल्याचे या वेळी अधोरेखित करण्यात आले.





या यज्ञाचे आध्यात्मिक महत्त्व विशद करताना श्री. अभय वर्तक म्हणाले की, आदिशक्ती देवी सतीच्या क्रोधातून प्रकट झालेल्या 'दशमहाविद्यां'मध्ये मातंगीदेवीचे स्थान अनन्यसाधारण आहे. देवी मातंगी ही आदिशक्तीची 'प्रधानमंत्री' म्हणजेच प्रमुख सल्लागार मानली जाते. शत्रूवर विजय मिळवण्यासाठी आणि प्रतिकूल परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी या देवीची उपासना फलदायी ठरते. ऐतिहासिक संदर्भांचा दाखला देत त्यांनी सांगितले की, त्रेतायुगात प्रभू श्रीरामाच्या अवताराच्या वेळीही राजमातंगी देवीचे तत्त्व कार्यरत होते, ज्यामुळे आदर्श रामराज्य स्थापन होऊ शकले. आजच्या काळातही तशाच दैवी शक्तीच्या आशीर्वादाने भारताचे संरक्षण व्हावे, हा या यज्ञामागील मुख्य उद्देश आहे.

या महायज्ञाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे १ हजार वर्षांपूर्वी आक्रमक महंमद गझनीने भग्न केलेल्या सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या दिव्य अंशांचे दर्शन! इतिहासाची साक्ष देणारे हे पवित्र अवशेष याठिकाणी दर्शनासाठी ठेवले जाणार असून भाविकांसाठी ही एक दुर्मिळ संधी असणार आहे असे श्री. चेतन राजहंस म्हणाले. यज्ञाची सुरुवात महासंकल्प, श्री गणेश आवाहन आणि पुण्याहवाचन होणार असून, श्री राजमातंगी देवीच्या मूलमंत्रांनी यज्ञामध्ये आहुती अर्पण केल्या जातील. यज्ञाचे पौरोहित्य इरोड, तामिळनाडू येथील शिवागम विद्यानिधी आगमाचार्य श्री. अरुणकुमार गुरुमूर्ती करतील तर शिवाचार्य श्री. गुरुमूर्ती हे यज्ञाचे मुख्य आचार्य असतील, असे पुरोहित अनब ज्योतिर्विद श्री. श्रेयस पिसोळकर म्हणाले. या यज्ञाला मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातील अनेक मंदिरांचे विश्वस्त आणि पुजारी सहभागी होणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे नवी मुंबई समन्वयक श्री. कैलास पाटील यांनी दिली.

सनातन संस्थेने आतापर्यंत ७५० हून अधिक यज्ञ-अनुष्ठाने केली आहेत. या यज्ञ सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, संत-महंत, राज्य सरकारमधील मंत्री, हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी, विचारवंत, वकील आणि उद्योजकांसह सुमारे ५ हजार भाविक उपस्थित राहतील. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी ज्या मुंबापुरीतून धर्मकार्याचा श्रीगणेशा केला, त्याच नगरीत होणारा हा महायज्ञ राष्ट्रउभारणीच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल ठरेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. सर्व धर्मप्रेमी हिंदूंनी सहकुटुंब या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. अभय वर्तक यांनी केले आहे.

# शाश्वत तीर्थ सम्मेद शिखरजी २० पंथी कोठी महामंत्री पदी संजय पापडीवाल यांची नियुक्ती


छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - दिगंबर जैन समाजाच्या अत्यंत प्राचीन एवं प्रतिष्ठेच्या श्री दिगंबर जैन बीसपंथी उपरैली कोठी मधुबन (झारखंड) या संस्थेवर १०८ फूट भगवान ऋषभदेव मूर्ती निर्माण अमेठी मांगीतुंगी चे महामंत्री व भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री संजय पापडीवाल छत्रपती सभाजीनगर पैठन याची यांची महामंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



दिगंबर जैन समाजाचे सर्वात मोठे तीर्थ शाश्वत भूमी श्री सम्मेद शिखरजी झारखंड येथील अत्यंत महत्त्वाची व प्राचीन संस्थे वर छत्रपती संभाजीनगरचे संजय पापडीवाल यांची महामंत्री नियुक्ती करण्यात आली आहे. याआधी तेथे ते विश्वस्त म्हणून काम पाहत होते.

श्री अरविंद रावजी दोशी महामंत्री यांनी राजीनामा दिल्यानंतर लोकशाही पद्धतीने सर्वानुमते श्री संजय पापडीवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय पापडीवाल यांनी या आधी जगातील सर्वात भव्य १०८ फूट भगवान ऋषभदेव मूर्ती मांगीतुंगी ला निर्माण करण्यामध्ये व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पंचकल्याणक मध्ये कार्य मोलाचे केले आहे. त्यांनी गजपंथा, शिर्डी, धर्मतीर्थ, शिखरजी, हस्तिनापुर, अयोध्या, कुंडलपुर देवगाव, आधी ठिकाणी विविध पदावर काम केलेले असून त्यांच्या या कामाचा अनुभवाचा फायदा त्यांना निश्चित होईल. त्यांचे या नियुत्तीमुळे पीठाधीश रवींद्रकीर्ती स्वामीजी आयोध्या, तीर्थ क्षेत्र कमेटीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री जम्मूप्रसादजी जैन गाझियाबाद,जवाहरलालजी जैन, श्री अशोक जी दोशी मुंबई, श्री हसमुख जी गांधी इंदोर, जीवनप्रकाश जैन, विद्वत महासंघाचे अध्यक्ष विजय जैन,श्री महावीरजी पाटणी छत्रपती संभाजी, नगर न्या. कैलासचंद चांदीवाल, प्रकाश अजमेरा अशा अनेक गणमान्य व्यक्तींनी त्यांचे देशभरातुन अभिनंदन केले आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल छत्रपती संभाजीनगर यांनी दिली.

# श्री.क्षेत्र पंचाळेश्वर येथे शनि अमावस्या निमित्त भगवान मुनिसुव्रतनाथांचा महामस्तकाभिषेक सोहळयाचे आयोजन



छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - पंचाळेश्वर येथील दिगंबर जैन समाजाचे श्री १००८ नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र आहे भारत भर प्रसिध्द आहे. गोदावरी काठेवर असलेले हे क्षेत्र अत्यंत दिव्य असून येर्णाया भाविकांचे आकर्षण ठरत आहे. हा सोहळा आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव व मयंकसागर महाराज यांच्या आशीर्वादाने आयोजीत करण्यात आला आहे.

शनि अमावस्या निमीत्त सकाळी १६ मे रोजी शनीवार १० वाजता भगवान मुनिसुव्रतनथाचां महामस्तकाभिषेक सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. यावेळी उपस्थित भाविकांना भिकुचद धनजय शुक्रजय विजय अजय काळेगोरे परीवार केज यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील जैन भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष गौतम काला ऊपाध्यक्ष ऋशब गंगवाल सूहास चूडीवाल सचिव भाऊसाहेब बाकलीवाल कोषाध्यक्ष संजय सेठी सहसचिव विजय पापडीवाल कैलास खोबरे विश्वस्त प्रकाश सेठी संदीप कासलीवाल, विलास पहाडे भगवानदास काला अशोक कासलीवाल राजेद्र काला संतोष अजमेरा हिरालाल धोदलकर, कार्यकारणी अध्यक्ष सुनिल पाटणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यांनी दिली

# इंधन बचतीसाठी महावितरणचे ...आता एक पाऊल पुढे!




छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर इंधन बचतीसाठी पेट्रोल व डिझेलऐवजी विद्युत वाहनांचा वापर करण्याचे आवाहन पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यास महावितरणने कृतीशिल प्रतिसाद दिला असून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांच्यासह सर्व संचालक आणि कार्यकारी संचालकांनी विद्युत वाहनांचा वापर सुरू केला आहे.

दरम्यान सर्व संचालकांसाठी गुरुवारी (१४ मे) नवीन विद्युत वाहने उपलब्ध झाले असून या ईव्ही वाहनांचा वापरही सुरू करण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या विद्युत वाहन धोरण २०२५ ला अनुसरून महावितरणने पेट्रोल व डिझेल वाहनांऐवजी विद्युत वाहनांना प्राधान्य दिले आहे. पहिल्या टप्प्यात महावितरणच्या मुख्य व्यवस्थापनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी विद्युत वाहनांच्या खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांनी विद्युत वाहनांचा याआधीच वापर सुरू केला आहे. गेल्या आठवड्याभरात आणखी १० विद्युत वाहने महावितरणच्या ताफ्यात दाखल झाले. या विद्युत वाहनांचा प्रादेशिक विभागांचे सहव्यवस्थापकीय संचालक आणि सर्व कार्यकारी संचालकांनी नुकताच वापर सुरू केला आहे.

दरम्यान मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत उर्वरित विद्युत वाहनांच्या उपलब्धतेसाठी महावितरणकडून विशेष पाठपुरावा करण्यात आला. ही वाहने गुरुवारी (१४ मे) उपलब्ध झाली. त्यानंतर संचालक श्री.सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), श्री.अनुदीप दिघे (वित्त), श्री.योगेश गडकरी (वाणिज्य), श्री.राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांनीही तात्काळ या विद्युत वाहनांचा वापर सुरु केला आहे.

महावितरणअंतर्गत सर्व मुख्य अभियंता तसेच क्षेत्रीय अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता यांच्या कार्यालयातही पेट्रोल किंवा डिझेलऐवजी फक्त विद्युत वाहनांचा वापर होईल याबाबतच्या प्रक्रियेला वेग देण्यात आला आहे.

# जलकुंभांच्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने करा - विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - शहराला १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने शहरातील विद्यमान तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या जलकुंभांमधून पाणी सोडण्यासाठी आवश्यक असलेल्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.



विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनिषा पलांडे, जीव्हीपीआर कंपनीचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर शहराला नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा सुरू करण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जीव्हीपीआर कंपनीला दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर या बैठकीत विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, न्यायालयाच्या निर्देशानुसार पाणीपुरवठा वेळेत सुरू करण्यासाठी विविध तांत्रिक कामे, पंपांची चाचणी तसेच जलकुंभांशी संबंधित किरकोळ कामे वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ घेऊन कामांना गती द्यावी. शहरातील सर्व जलकुंभांची अपूर्ण कामे पूर्ण करून सर्व ठिकाणच्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

या सर्व कामांवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दररोज देखरेख ठेवावी, तसेच महानगरपालिकेने शहरातील प्रत्येक घरापर्यंत नळजोडणी पोहोचविण्यासाठी स्थानिक नगरसेवकांसोबत समन्वय बैठक घेऊन नियोजन करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

नक्षत्रवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी घेणे, जॅकवेलची कामे, जलवाहिन्यांची स्वच्छता, स्कॉर व्हॉल्व्ह व बटरफ्लाय व्हॉल्व्हची दुरुस्ती व तपासणी, पाण्याच्या शुद्धतेची चाचणी तसेच इतर अंतर्गत व किरकोळ कामे पूर्ण झाल्यानंतरच संपूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा सुरू करता येणार असल्याचेही बैठकीत नमूद करण्यात आले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जीव्हीपीआर कंपनी आणि महानगरपालिका यांनी परस्पर समन्वय साधून सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत, अशी सूचना विभागीय आयुक्तांनी केली. तसेच, ज्या ठिकाणी कंत्राटदार काम वेळेत पूर्ण करत नसतील किंवा काम करण्यास टाळाटाळ करत असतील, त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# राज्य राखीव पोलीस बल शिपाई भरतीची लेखी परीक्षा १७ मे रोजी

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २० वरणगाव यांच्या मार्फत सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ अंतर्गत लेखी परीक्षा शनिवार, १७ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० या वेळेत होणार असून उमेदवारांनी सकाळी ७.०० वाजेपर्यंत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

परीक्षेसंदर्भातील सविस्तर सूचना महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल संकेतस्थळ https://www.maharashtrasrpf.gov.in येथे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

ही परीक्षा महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी), गेट क्रमांक ०१, ०३, ०५ व ०८, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर, श्रेयस इंजिनिअरिंग कॉलेज, सातारा तांडा, छत्रपती संभाजीनगर, चाटे स्कूल, गट क्रमांक ९८, रेणुका माता मंदिर रोड, बीड बायपास, सातारा परिसर तसेच एंजल स्कूल, सातारा परिसर येथे आयोजित करण्यात आली आहे.

उमेदवारांनी वेळेचे काटेकोर पालन करून आवश्यक कागदपत्रांसह परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन विक्रम साळी, समादेशक तथा भरती प्रमुख, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२०, वरणगाव, जि. जळगाव (कॅम्प राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४, छत्रपती संभाजीनगर) यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# 'लंडन हेराल्ड'या जगप्रसिद्ध मासिकात नाडीयोगतज्ज्ञ डॉ. अशोक सरोदे यांच्या मुलाखत प्रसिद्धीचे विमोचन संपन्न

वैजापूर,दि. १५ (प्रतिनिधी) - पुणे,येरवडा येथील साहित्यरत्न लोकशहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक कला रंगमंदिर येथील वातानुकूलित भव्य रंगमंचावर छत्रपती संभाजीराजे भोसले यांच्या जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र गौरव सोहळ्याचे आयोजन जगप्रसिद्ध मासिक पत्रिका ' लंडन हेराल्ड 'चे शिईओ व समाजसेवक डॉ.अविनाश सुकूंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले

होते यात विविध मान्यवरांना महाराष्ट्र गौरव व अन्य इतर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले,नृत्य स्पर्धा,फॅशन शो असे विविध कार्यक्रम या ठिकाणी आयोजित केले होते.यात वैजापूरचे विख्यात नाडीयोगतज्ज्ञ डॉ अशोक सरोदे

यांची ४ पानांची सचित्र मुलाखत लंडन हेराल्ड पत्रिकेत मुखपृष्ठावर डॉ. सरोदे यांच्या फोटोसह हिंदी व इंग्रजी दोन्ही भाषेत प्रकाशित करण्यात आली.या दोन्ही आवृत्तीचे विमोचन या




कार्यक्रमात डॉ. अविनाश सुकूंडे, पठाण एस.एन. (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,नागपूरचे माजी कुलगुरू), महेश सुर्वे ( स्टुडंट्स वेलफेयर असोशिएशन, पुण्याचे डायरेक्टर), मा.बाप्पुसाहेब भोसले (संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष: दलित पॅन्थर आफ इंडिया तसेच आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष: शके दी ट्री मुव्हमेंट, न्युयॉर्क अमेरिका) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या अंकातील मुलाखतीत डॉ. सरोदे यांनी जनतेला आवाहन केले आहे कि,ज्या व्यक्तींना किंवा समुहाला आपापल्या प्रकृतिचे निदान करून योगाद्वारा रोगमुक्त बनायचे असेल त्यांनी माझ्याशी संपर्क करावा.

सोबत फोन नं.दिलेला आहे. एवढ्या जगप्रसिध्द मासिक पत्रिका मध्ये डॉ.सरोदे यांची मुलाखत प्रसिद्ध झाल्याबाबत त्यांना देशातून अभिनंदनाचे फोन येत आहेत तसेच वैजापूरचे ना.प्रतोद रमेश पा. बोरनारे सर, नगराध्यक्ष डॉ. दिनेशभाऊ परदेशी, प्रविन पा.सावंत, रामचंद्र पिल्दे, गोरखनाना बोडखे, बी.बी. थोरात, शुभदाताई चव्हाण, शिवनाथ इंगळे, राहुल व आशिष सरोदे, धुळे, ठोकळ, समीर लोंढे, किशोर अहिरे, राजेंद्र मेढे, कुबेर प्रतिष्ठान चे सर्व सदस्य, गोरव दोडे, रविन्द्र आप्पा साखरे आदिंनी अभिनंदन केले आहे.

# वामनदादा कर्डक पुण्यतिथी

सामाज व्यथित गीतांचे जनक होते वामन दादा
भिमाच्या गीतांचे झरा होते वामन दादा
सामाजिक वेदनांची जाण असणारे समाजशील दादा
गोर,गरीब,दीन, दुबळ्यांचा आवाज होते वामन दादा
भिमाच्या कार्याची काव्यात गुंफण करणारे वामन दादा
काव्य व शाहिरीतून व्यथा मांडणारे होते वामन दादा
वामन दादा कर्डक सुरनायक भीमगीतांचे
हृदय भरलेले त्यांचे दीन,दुबळ्यांच्या व्यथांचे
वामन दादा कर्डक गोर ,गरिबांचा आवाज
कविता, शाहिरीला त्यांच्या व्यथांचा साज...

- धोंडीरामसिंह राजपूत

# जिल्हा नियोजन समितीची बैठक; जिल्ह्याच्या विकासात सर्वांचा सहभाग आवश्यक-पालकमंत्री शिरसाट





छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात मोठ्याप्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक वाढत आहे. ही गुंतवणूक वाढत असतांना जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था चांगली राखून जिल्ह्यातील वातावरण सौहार्दपूर्ण राखणेही आपली सर्वांची जबाबदारी आहे. जिल्ह्याच्या विकासात सर्वांचा सहभाग आवश्यक आहे,असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे केले.

जिल्हा नियोजन समितीची आज जिल्हा नियोजन सभागृहात बैठक पार पडली. इमाव कल्याण, दुग्ध विकास व अपारंपरिक उर्जा मंत्री अतुल सावे, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, खा.डॉ. कल्याण काळे, विधान परिषद सदस्य आ.अंबादास दानवे, आ. विक्रम काळे, आ. सतिष चव्हाण, विधानसभा सदस्य आ. प्रदीप जयस्वाल, आ. रमेश बोरनारे, आ. प्रशांत बंब, आ. संजना जाधव, आ. विलास भुमरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल,जिल्ह्याचे पालक सचिव हर्षदीप कांबळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ तसेच अन्य संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सन २०२५-२६ साठी मंजूर नियतव्यय सर्वसाधारण ७३५ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजना १०४ कोटी व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना १० कोटी ४६ लख रुपये च्या झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली. सन २०२५-२६ साठी सर्व मंजूर नियतव्यय १०० टक्के खर्च झाला.तर सन २०२६-२७ साठी मंजूर नियतव्ययास मान्यता देण्यात आली. सन २०२६-२७ साठी सर्वसाधारण ७९४ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजना १०४ कोटी रुपये, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ११ कोटी २१ लक्ष असे एकूण ९०९ कोटी २१ लाख रुपये अशी तरतूद आहे. त्यास मान्यता देण्यात आली.

बैठकीत जिल्हा परिषद अध्यक्ष गलांडे यांनी मागणी केली की, जिल्हा परिषदेच्या शाळा खोल्या, अंगणवाडी बांधकामासाठीसाठी मंजूर नियतव्ययात वाढ करावी.

आ. बोरनारे व आ. भुमरे यांनी सौर कृषी पंप हे लांब अंतरावरुन पाणी आणण्यासाठी निकामी ठरत असून अशा क्षेत्रामध्ये विद्युत पंप बसवता यावे यासाठी त्या क्षेत्रात ट्रान्सफॉर्मरची संख्या वाढवावी.

अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांनी सांगितले की, शासनाचे धोरणानुसार सर्व शासकीय इमारती पूर्णपणे सौरीकरण करावयाचे आहे. त्यासाठी ५५ कोटी रुपयांचा निधी राखून ठेवण्यात आला आहे. त्याचा वापर करुन अधिकाधिक शासकीय इमारती सौर उर्जेवर आणाव्या. तसेच शहरात चार्जिंग स्टेशन्सची संख्याही वाढविण्यात येणार आहे. शहरातील खुल्या विद्युत वाहिन्यांना संरक्षित करुन झाकण्याची कारवाई महावितरणने करावी,असे निर्देश त्यांनी दिले. आ. प्रशांत बंब यांनी नेमणूक असलेल्या गावी न राहणाऱ्या शासकीय अधिकारी कर्मचारी यांचा विषय मांडला व अशा कर्मचारी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली. तसेच जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेबाबत प्रश्न मांडला.

आ. अंबादास दानवे यांनीही जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेसंदर्भात प्रश्न उपस्थित केला. रात्रीच्या वेळी होणारी वाळू वाहतुक याबाबत उपाययोजना करावी अशी मागणी केली. खा. डॉ.कल्याण काळे यांनी मुद्दा मांडला की, संसदेच्या अधिवेशन काळात जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजीत करु नये. ग्रामिण भागात लोडशेडींगची समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना करावी.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. म्हणाले की, मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल.

पालकमंत्री शिरसाट यांनी सांगितले की, जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा बसावा म्हणून पोलीस दलाला अत्याधुनिक वाहने, सीसीटीव्ही यंत्रणा आदी बसविण्यात आली आहे. त्यासाठी पुरेसा निधी देण्यात आला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला (घाटी) देण्यात आलेल्या निधीमुळे आज तेथील परिस्थिती बदलली आहे. खुप मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाल्या असून तेथील सेवांचा दर्जा , गुणवत्ता सुधारली आहे. महानगरपालिकेतही ड्रेनेज सफाईसाठी रोबोटचा वापर करण्यासाठी निधी उपलब्ध केला आहे. जिल्ह्यात औद्योगिक गुंतवणूकीवर अनिष्ट परिणाम होऊ नये यासाठी कायदा सुव्यवस्थेस सर्व क्षेत्रात उत्तम स्थिती राखणे हे आपले कर्तव्य आहे. जिल्ह्यात सर्व परिस्थिती विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल,असेही त्यांनी सभागृहाला आश्वस्त केले.

## अनियमित बांधकाम हटविण्यात येणार; गुंठेवारी नियमित असलेल्या बांधकामांनाच बँकांनी गृहकर्जे मंजूर करावे-विभागीय आयुक्त जी. श्रीकांत



छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील विनापरवाना असलेली मालमत्ता गुंठेवारी नियमित करण्याची प्रक्रिया सुरू असून शासन नियमांनुसार ३१ डिसेंबर २०२० पूर्वीची विनापरवाना बांधकामे नियमित करण्यात येणार आहेत. त्यानंतरची बांधकामे अनधिकृत मानली जाणार असून अशी बांधकामे हटविण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्व बँक व्यवस्थापकांनी गुंठेवारी नियमित असल्याचे अधिकृत प्रमाणपत्र आणि बांधकाम परवाने तपासल्याशिवाय गृहकर्ज मंजूर करू नये, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामांना कर्जपुरवठा तसेच घनकचरा व्यवस्थापनाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, सहआयुक्त अंजली धानोरकर, प्रभारी उपायुक्त सुनंदा पारवे, उपमुख्यलेखा व वित्त अधिकारी साधना बांगर, जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा समन्वयक, विविध बँकांचे व्यवस्थापक तसेच महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, शहराबाहेरील भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत इमारती उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे लोकसंख्या वाढून पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि ड्रेनेज व्यवस्थेवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. शासनाने ३१ डिसेंबर २०२० पूर्वीची गुंठेवारी बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला असून सुधारणा शुल्क (बेटरमेंट चार्जेस) भरून ही प्रक्रिया सुरू आहे. काही ठिकाणी चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे बँकांकडून गृहकर्ज घेण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा अनधिकृत बांधकामांवर कारवाई झाल्यास बँकांसमोर कर्जवसुलीची समस्या निर्माण होते. त्यामुळे सर्व बँकांनी गुंठेवारी नियमित असल्याचे अधिकृत प्रमाणपत्र तपासूनच गृहकर्ज मंजूर करावे. तसेच अधिकृत बांधकाम प्रस्तावांना गुंठेवारी नियमित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. वाढत्या लोकसंख्येमुळे विशेषतः वाळूज औद्योगिक परिसरात घनकचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. औद्योगिक क्षेत्रासोबतच लगतच्या भागात मोठ्या प्रमाणात निवासी वसाहती निर्माण होत आहेत. त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन व व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. त्यासाठी औद्योगिक क्षेत्रात कचरा प्रक्रिया व व्यवस्थापनासाठी किमान दहा एकर जागा आरक्षित ठेवावी. तसेच सिडकोच्या ज्या जागांची विक्री झालेली नाही, त्या ठिकाणीही किमान दहा एकर जागा कचरा व्यवस्थापनासाठी राखीव ठेवण्याची सूचना विभागीय आयुक्तांनी केली.

## खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक: शेतकऱ्यांना वेळेवर बियाणे, खते आणि कर्ज उपलब्ध करा-पालकमंत्री शिरसाट




छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी वेळेवर बियाणे, खते आणि पीक कर्ज उपलब्ध करुन द्या, जेणेकरुन हंगामाचे काम सुरळीत पार पडेल,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज दिले.कर्ज माफीला पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याबाबत असलेला संभ्रम दुर करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या येत्या बैठकीत विषय मांडू असेही पालकमंत्री शिरसाट यांनी उपस्थितांना सांगितले.

खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक आज जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली. इमाव कल्याण, दुग्ध विकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, खा.डॉ. कल्याण काळे, विधान परिषद सदस्य आ.अंबादास दानवे, आ. विक्रम काळे, आ. सतिष चव्हाण, विधानसभा सदस्य आ. प्रदीप जयस्वाल,आ. रमेश बोरनारे, आ. प्रशांत बंब, आ. संजना जाधव, आ. विलास भुमरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील तसेच अन्य संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्ह्याच्या खरीप हंगामाचे नियोजन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी यांनी सादर केले.

यावेळी लोकप्रतिनिधींनी मुद्दे मांडले.

आ. प्रशांत बंब यांनी सुचना केली की, बँका शेतकऱ्यांना उद्दिष्टाइतके कर्ज वाटप करीत नाहीत. तसेच शेतकऱ्याच्या खात्यावर जमा होणाऱ्या अन्य अनुदानांवर होल्ड लावून ते कर्जात जमा करतात. तसेच खतांचे आवंटन हे जितकी आवश्यकता आहे तितके करावे. त्यापेक्षा कमी करु नये. तसेच खतांचे लिंकींग हा प्रश्न वरिष्ठ पातळीवर मांडून त्यावर तोडगा काढावा असेही त्यांनी मुद्दे मांडले.

खा. कल्याण काळे म्हणाले की, खते हे निर्धारित किंमतीत मिळतात का? याची वस्तुनिष्ठ माहिती घ्यावी. खतांचे लिंकींग या प्रकाराला आळा घालावा. तसेच खतांचे आवंटन वेळेवर यावे यासाठी प्रयत्न करावे. त्यांनी सांगितले की, सोयाबीन बियाणे शेतकऱ्यांना घरगुती उपलब्धता करण्यास सांगितले आहे. त्याची उगवण क्षमता तपासणी करुन ते बियाणे खरोखर उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी.

आ.बोरनारे म्हणाले की, खतांचे लिंकिंग होऊ नये यासाठी प्रभावी उपाययोजना राबवावी. संलग्न जिल्ह्यातील शेतकरी ही आपल्या जिल्ह्यातून खतांची खरेदी करतात ही बाब लक्षात घेऊन आवंटन मागणी नोंदवावी. तसेच नजिकच्या रेल्वे स्थानकावरुन खतांची रॅक उपलब्ध करावी, अशी सुचना केली. आ. विलास भुमरे यांनी शेतकऱ्यांच्या विविध अनुदानाची रक्कम होल्ड करुन कर्ज खात्यात जमा करण्याच्या प्रकारास निर्बंध करावा, अशी सुचना केली. आ. अंबादास दानवे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना कर्ज माफीची घोषणा शासनाने केली आहे. तथापि, आता नव्या हंगामासाठी कर्ज उपलब्ध करतांना जुने पीक कर्ज परतफेड केल्याशिवाय नवे कर्ज उपलब्ध होणार नाही. अशा परिस्थितीत संबंधित शेतकरी कर्ज माफीला पात्र राहिल का? किंवा कर्ज माफीला पात्र शेतकरी नव्या पीक कर्जाला पात्र असेल का? याबाबतचा संभ्रम दुर करावा. तसेच खताचे लिंकींग बाबत वरिष्ठ पातळीवरुन कारवाई व्हावी. तसेच सोयाबीन बियाणे उपलब्धतेबाबत खातरजमा करावी, अशा सुचना केल्या. खरीप आढावा बैठकीत पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, घरगुती सोयाबीन बियाणे वापराबाबत शेतकऱ्यांना सांगितले जात असले तरी या बियाण्याची उगवण क्षमता तपासणी करावी. या तपासण्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना अवगत करावे. तलावांमधील गाळ काढून तो शेतकऱ्यांच्या शेतात टाकला जावा याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.बी-बियाणे, खतांची मागणी आवश्यकता पूर्ण होईल त्याच्या दीडपट करावी. त्यात संलग्न जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांच्या वापराचा विचार व्हावा. तसेच पीक कर्ज व कर्ज माफी याबाबत असलेला संभ्रम दूर व्हावा यासाठी मंत्रीमंडळाच्या येत्या बैठकीत विषय मांडू,असे पालकमंत्री शिरसाट यांनी सांगितले.

## सुखना नदीला मिळणार नवे रूप; पुनरुज्जीवनासाठी सभापती अनिल मकरीये यांनी केली प्रत्यक्ष पाहणी



छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- शहरातील सुखना नदीला तिचे नैसर्गिक सौंदर्य आणि प्रवाह पुन्हा मिळवून देण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. या 'सुखना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत' सुरू असलेल्या कामांची सविस्तर पाहणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरीये यांनी शुक्रवारी, १५ मे २०२६ रोजी प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्यांसह नदीपात्राचा दौरा केला. यावेळी त्यांनी केवळ कामाचा आढावाच घेतला नाही, तर नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी आणि पात्र स्वच्छ करण्यासाठी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना जागेवरच स्पष्ट आणि कडक आदेश दिले आहेत.

या पाहणी दरम्यान सभापती मकरीये यांनी अतिक्रमण हटाव विभागाचे प्रमुख श्री. संतोष वाहुळे यांना नदीपात्रात असलेली सर्व अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून नदीचा मूळ प्रवाह प्रवाही होण्यास मदत होईल. नदीत मिसळणाऱ्या दूषित पाण्याबाबत गांभीर्य व्यक्त करत त्यांनी ड्रेनेज विभागाचे कार्यकारी अभियंता आणि वॉर्ड ५ व ६ च्या अभियंत्यांना आदेश दिले की, नदीत प्रवाहित होणारे दुर्गंधीयुक्त पाणी तात्काळ बंद करण्यात यावे. जर नागरिकांकडून किंवा सोसायट्यांकडून सांडपाणी सोडले जात असेल तर त्यांच्यावर नियमानुसार कडक कारवाई करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. विशेषतः औद्योगिक वसाहतींमधून जर रासायनिक किंवा दुर्गंधीयुक्त पाणी नदीत येत असल्याचे आढळले, तर संबंधित उद्योगांवर सील ठोकण्याची कठोर कार्यवाही करण्याचे आदेशही त्यांनी यावेळी दिले.

नदीचा परिसर निसर्गरम्य करण्यासाठी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नदीच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे नियोजन मुख्य उद्यान अधिकारी विजय पाटील यांनी करावे, असे सभापतींनी सांगितले. त्याचप्रमाणे, नदीपात्रात कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी उपायुक्त नंदकिशोर भोंबे आणि घनकचरा विभागाच्या अधिकाऱ्यांना विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या महत्त्वपूर्ण पाहणी दौऱ्याप्रसंगी नगरसेविका श्रीमती प्रियंका दीपक खोतकर, श्रीमती अर्चना संजय चौधरी आणि माजी नगरसेवक श्री. संजय चौधरी यांच्यासह झोन ५ व ६ चे सहाय्यक आयुक्त, उप अभियंता आणि महापालिकेचे इतर सर्व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या सर्वांच्या समन्वयाने सुखना नदी लवकरच पुनरुज्जीवित होऊन शहरासाठी एक नवीन ओळख निर्माण करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी शहर अभियंता संजय कोंबळे, अतिरिक्त शहर अभियंता अनिल तनपुरे, उप आयुक्त नंदकिशोर भोंबे, विजय पाटील, सहाय्यक आयुक्त झोन ५ प्राजक्ता वंजारी, वार्ड अभियंता मधुकर चौधरी आदींची उपस्थिती होती.

## 'योजना सामाजिक न्यायाच्या' जिल्हा माहिती कार्यालयाच्या पुस्तिकेचे विमोचन



छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- जिल्हा नियोजन समितीच्या आजच्या बैठकीत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जिल्हा माहिती कार्यालयाने तयार केलेल्या 'योजना सामाजिक न्यायाच्या' या सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इमाव कल्याण, दुग्ध विकास व अपारंपरिक उर्जा मंत्री अतुल सावे, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, खा.डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. यावेळी सभागृहात विधान परिषद सदस्य आ.अंबादास दानवे, आ. विक्रम काळे, आ. सतिष चव्हाण, विधानसभा सदस्य आ. प्रदीप जयस्वाल,आ. रमेश बोरनारे, आ. प्रशांत बंब, आ. संजना जाधव, आ. विलास भुमरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल,जिल्ह्याचे पालक सचिव हर्षदीप कांबळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, सहा. आयुक्त सामाजिक न्याय रविंद्र शिंदे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने तसेच अन्य संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना: ८०० भाविक 'बुद्धगया' यात्रेसाठी रवाना




छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री तीर्थाटन योजने'अंतर्गत छत्रपती संभाजी नगर, बीड,परभणी ,जालना या चार जिल्ह्यातील एकूण ८०० नागरिकांची बौद्ध धर्मीयांचे पवित्र श्रद्धास्थान असलेल्या बुद्धगया (बिहार) यात्रेसाठी रेल्वे आज सायंकाळी रवाना झाली.

याप्रसंगी सामाजिक न्याय व विशेष साह्य विभागाचे मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी प्रवाशांना गुलाबपुष्प देऊन निरोप दिला, यावेळी आमदार प्रशांत बंब, महापौर समीर राजूरकर,सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे,विभागीय आयुक्त जी. श्रीकांत , माजी महापौर नंदकुमार घोडेले, नगरसेवक सिद्धांत शिरसाट, हर्षदा शिरसाट , समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात, सहाय्यक आयुक्त रवींद्र शिंदे, यांच्यासह सामाजिक न्याय विभागाचे विविध अधिकारी ,यांची उपस्थिती होती. सुखरूप आणि मंगलमय प्रवासासाठी सर्व उपस्थित मान्यवरांनी प्रवाशास शुभेच्छा दिल्या.

छत्रपती संभाजी नगर रेल्वे स्थानक परिसर , रेल्वे फुलांनी सजवण्यात आली होती. भारावलेल्या आणि उत्साही वातावरणाने प्रवाशाचे स्वागत गुलाब पुष्प देऊन वाद्याच्या गजरात करण्यात आले. लेझीम पथकाने प्रवाशांचा उत्साह द्विगणित केला. यामुळे यात्रेकरूंच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता.

प्रवाशांना निरोपासाठी आयोजित कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले की, अनेक ज्येष्ठ नागरिकांची आयुष्यात एकदा तरी पवित्र तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा असते, परंतु आर्थिक किंवा इतर अडचणींमुळे ते जाऊ शकत नाहीत. अशा सर्व ज्येष्ठांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री तीर्थाटन योजना' सुरू केली आहे. बुद्धगया येथे भगवान बुद्धांच्या ज्ञानप्राप्ती झालेल्या भूमीचे दर्शन घेण्याचे भाग्य सर्व प्रवाशांचा लाभो , आणि हा प्रवास सुखकर होवो, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रेल्वेतील वातानुकूलित स्लीपर कोच असल्यामुळे प्रवाशांना याबाबत अडचण होणार नाही तसेच जेवण आणि पाण्याची व्यवस्था रेल्वेतच करण्यात आली असून आरोग्य तपासणी साठी रेल्वेमध्ये डॉक्टरांची सुविधा उपलब्ध करून दिलेले आहे. प्रत्येक गटासाठी सामाजिक न्याय विभागा अंतर्गत विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती समन्वयासाठी करण्यात आलेली आहे . सुखकर प्रवाशात प्रवासाची काळजी शासनाने घेतले असल्याचे मंत्री शिरसाट यांनी सांगितले.तीर्थक्षेत्र बुद्धगया बरोबरच इतर तीर्थ ठिकाण आणि पर्यटन स्थळे बघण्याची व्यवस्था या मध्ये करण्यात आली आहे. बंधुभाव आणि एकात्मतेने हा प्रवास सुखकर करून तीर्थाटनाचा आनंद घ्यावा अशा शुभेच्छा मंत्री संजय शिरसाट यांनी प्रवाशांना दिल्या.

छत्रपती संभाजी नगर येथील मुख्यमंत्री तीर्थाटन योजनेचा लाभार्थी आसराबाई कांबळे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली, त्या म्हणाल्या की 'तीन वर्षानंतर माझी बुद्धगया जाण्याचे स्वप्न मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना अंतर्गत पूर्ण झाल्याबद्दल सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट व राज्य शासनामुळे पूर्ण झाले'. प्रतिनिधिक स्वरूपात त्यांना तीर्थ दर्शन योजनेचे तिकिट प्रदान करण्यात आले. तसेच परभणी येथील बाळू दूतराज यांनाही तिकीट देण्यात आले.

(पान १ वरुन)

### माजी भाजपा आमदार...

आहेत'', असे पीटीआयने वृत्त दिले आहे. ''अपिलावर लवकर निर्णय होत नसेल तर उच्च न्यायालयाने सेनगर याची जन्मठेपेची शिक्षा रद्द करण्याबाबतच्या याचिकेवर पुनर्विचार करावा'', असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

बलात्काराच्या आरोपांवरील शिक्षेविरुद्ध अपील प्रलंबित असताना सेनगरच्या जन्मठेपेच्या शिक्षा स्थगित करून त्याला जामिनावर सोडण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला होता. या निर्णयाला केंद्रीय अन्वेषण विभागाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सीबीआयने दाखल केलेल्या अपिलावर सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश दिला आहे.

## इंधन बचतीसाठी मकरीये यांच्याकडून ईव्ही कारचा वापर सुरू

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- देशात इंधन बचतीची गरज लक्षात घेऊन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधनाचा वापर जपून करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती श्री अनिल मकरीये यांनी आजपासून इलेक्ट्रिक वाहनाचा वापर सुरू केला आहे. देशात डिझेल टंचाईचे संभाव्य सावट लक्षात घेता आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीनेही इलेक्ट्रिक वाहनांचा वापर हा काळाची गरज असल्याचे मत श्री मकरीये यांनी व्यक्त केले. आज त्यांनी महापालिकेतील कार्यालयीन कामकाज तसेच विविध ठिकाणांच्या पाहणी दौऱ्यासाठी ईव्ही कारचा वापर करून इंधन बचतीचा संदेश दिला. यावेळी बोलताना श्री मकरीये यांनी सांगितले की, पारंपरिक इंधनावर अवलंबून राहण्याऐवजी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे. इलेक्ट्रिक वाहनांमुळे इंधन बचत होण्यास मदत होईलच, शिवाय प्रदूषण कमी करण्यासाठीही हा महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो.

## जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. आज आकाशवाणीवर; जनगणना याविषयावर देणार माहिती



छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. शनिवार दि.१६ रोजी सकाळी ८ वा. ४० मि. नी. आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावर 'जनगणना' या विषयावर एका मुलाखतीद्वारे माहिती देणार आहेत. त्यांच्याशी याविषयावर जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी बातचीत केली आहे.

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन 'राष्ट्रीय जनगणना व त्यासंबंधित प्रक्रिया', याविषयी जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांची जिल्हा माहिती अधिकारी श्री.मिलिंद दुसाने यांनी घेतलेली मुलाखत शनिवार दि.१६ रोजी सकाळी ८ वा. ४० मि. नी प्रसारीत होणार आहे. एफ.एम. १०१.७ Mhz या वाहिनीवर ही मुलाखत ऐकता येईल आणि News on AIR ॲप वर ही मुलाखत देशाच्या कोणत्याही भागात ऐकता येणार आहे.

जनगणना, प्रक्रिया, जिल्ह्यातील तयारी, लोकांचे शंकानिरसन अशा विविध मुद्यांवर त्यांनी या मुलाखतीतून जनगणना या विषयाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. ही मुलाखत श्रोत्यांनी आवर्जून ऐकावी असे आवाहन कार्यक्रम अधिकारी सुजीत बनसोडे यांनी केले आहे.